लोकमत १५ जून 22

# एमपीएससी, यूपीएससीमध्ये वारंवार अपयश आलेल्यांचे पुढे होते काय?

प्रज्ञा म्हात्रे
लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** जिल्ह्यातून हजारो विद्यार्थी आयएएस, आयपीएस तसेच, शासकीय अधिकारी बनण्याची स्वप्ने पाहत स्पर्धा परीक्षांची तयारी करीत असतात. या परीक्षेला बसणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला यात यश येतेच असे नाही आणि वारंवार येणाऱ्या अपयशामुळे हे विद्यार्थी खचून जातात. त्यामुळे या विद्यार्थ्यांनी दुसरा पर्याय निवडण्याचा सल्लाही शिक्षणतज्ज्ञ देतात.

दरवर्षी स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्यांची संख्या, त्यातून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या बरीच मोठी तफावत पाहायला मिळते. हे विद्यार्थी ही परीक्षा वारंवार देतात. तर दुसरीकडे वय उलटून जात असल्याचे दडपण येत असते. वारंवार येणारे अपयश पाहता दुसऱ्या पर्यायाकडे नाइलाजाने जातात आणि स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण होण्याचे त्यांचे स्वप्न अपूर्णच राहते, असे या परीक्षेची तयारी करणारे सांगतात.

## आकडे काय सांगतात?

| २३ जानेवारी २०२२ | ५ जून २०२२ |
|---|---|
| एमपीएससी परीक्षेला बसलेले विद्यार्थी | यूपीएससी परीक्षेला बसलेले विद्यार्थी |
| ९,३२१ | ५,८८९ |

## वर्षाचा खर्च एक लाख

घरच्या घरी अभ्यास करीत असेल तर पुस्तकाचा खर्च सात ते आठ हजार रुपये येतो. कोचिंग क्लास हॉस्टेलसह अंदाजे एक लाख रुपये खर्च येतो आणि क्लास लावला तर ३० ते ६० हजार रुपये फी घेतली जाते.

## दोन टक्के यशस्वी

स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आणि उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या यात मोठी दरी असल्याने या विद्यार्थ्यांपुढे सामाजिक आणि शैक्षणिक प्रश्न आ वासून समोर उभे राहतात. त्यामुळे असे विद्यार्थी दुसरा पर्याय निवडतात.

## वय उलटू लागले, पुढे काय?

तीन ते चार वर्षे झाले एमपीएससीचा अभ्यास करीत आहे. घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे अर्थार्जनासाठी बाहेर पडावे लागते. त्यामुळे अभ्यासाकडे दुर्लक्ष होते. यश येत नसल्याने आता एमपीएससीकडे मी पर्याय म्हणून पाहत आहे. एमएसडब्ल्यूचा अभ्यास करीत आहे. - अजय

मी यूपीएससीची तयारी करीत आहे. परीक्षा २०२३ ला देणार आहे. त्यानंतर वारंवार अपयश येत गेले तर पार्टटाईम किंवा फुलटाईम नोकरी करणार. प्लॅन बी तयार आहे. - गोविंदा

मी यूपीएससीची तयारी करीत आहे. उत्तीर्ण होण्याच्या दृष्टीने नक्कीच प्रयत्न करीत आहे; परंतु यश न आल्यास प्लॅन बी तयार आहे. - सेजल

## दुसरा पर्याय असायलाच हवा

यूपीएससी परीक्षा ज्यांना द्यायची आहे त्यांनी तीन वर्षे प्रामाणिकपणे अभ्यास करावा. त्यात यश येत नसेल तर दुसरा पर्याय निवडायला हवा. स्पर्धा परीक्षेची तयारी अकरावी- बारावीपासूनच करावी, त्यामुळे पदवीधर झाल्यानंतर बरीच तयारी झालेली असते. या परीक्षांत अपयश आले तर खचून जाऊ नका.

- **महादेव जगताप**, संचालक, देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था

स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांकडे दुसरा पर्याय असायलाच हवा. कोणत्याही क्षेत्रात प्लॅन ए आणि प्लॅन बी असायलाच हवे. पूर्ण लक्ष हे प्लॅन 'ए'वर असायला हवे आणि त्यासाठी झटले पाहिजे; परंतु मनासारखे यश प्लॅन 'ए'मध्ये नाही मिळाले तर प्लॅन 'बी' स्वीकारायला हवा.

- **डॉ. चंद्रशेखर मराठे**, माजी प्राचार्य, ज्ञानसाधना महाविद्यालय

फिरकी

महाराष्ट्र टाईम्स
दि. २७/०६/२०२२.

मकरंद जोशी
mtthaneplus@timesgroup.com

# पिढ्या घडवणारे शिक्षक
# एस.व्ही.कुलकर्णी

सुमारे ९५ वर्षांपूर्वीची, म्हणजे सन १९२६ सालची गोष्ट. कोल्हापूरच्या राजाराम विद्यालयातील एका विद्यार्थ्याने सहज गंमत म्हणून आपल्याच एका शिक्षकांच्या शिकवण्याची नक्कल वर्गात करून दाखवली. ही गोष्ट त्या शिक्षकांना कळल्यावर त्यांनी त्या मुलाला शिक्षा म्हणून सांगितले की, आता पुढच्या तासाला माझ्याऐवजी तूच इंग्रजीची कविता शिकव आणि त्या मुलाने ते आव्हान स्वीकारले. जणू नियतीनेच त्या शिक्षकांकडून त्या मुलाचे भविष्य सांगितले होते. विद्यार्थीवयात शिक्षा म्हणून इंग्रजी शिकवणारा तो मुलगा पुढे इंग्रजी उत्तम शिकवणारा शिक्षक तर झालाच, पण आपल्या उपक्रमशीलतेतून त्याने आपल्या विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्वही समरसून घडवले. तो मुलगा म्हणजेच ज्यांनी एक आदर्श शिक्षक म्हणून ठाणेकरांच्या कित्येत पिढ्या घडवल्या आणि ठाण्याच्या शैक्षणिक, सामाजिक,

## (वि)स्मरणातले ठाणेकर

सांस्कृतिक वर्तुळावर आपला ठसा उमटवला ते एस. व्ही. कुलकर्णी सर.

सत्यरंजन विठ्ठलराव कुलकर्णी या पूर्ण नावापेक्षा सगळ्या ठाणेकरांसाठी एस. व्ही. (किंवा स. वि.) याच नावाने परिचित असलेले आणि आपल्या इंग्रजीवरील प्रभुत्वासाठी प्रसिद्ध असलेले एस. व्ही. मूळचे कोल्हापूरचे. बिळाशी या गावात २ मार्च १९१३ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण त्याच गावात झाले. चौथीनंतरच्या शिक्षणासाठी एस. व्ही. कोल्हापूरला आपल्या बहिणीकडे आले. मॅट्रिक झाल्यानंतर त्यांनी पुण्यातल्या फर्ग्युसन महाविद्यालयातून बीएची (ऑनर्स) पदवी घेतली. नोकरीच्या शोधात असलेल्या स. विं. ना प्रख्यात कादंबरीकार वामन मल्हार जोशी यांनी एक चिठ्ठी लिहून ठाण्याच्या मो. ह. विद्यालयात जायला सांगितले. तेव्हा मो. ह. चे मुख्याध्यापक एन. टी. केळकर होते. त्यांनी लगेच वर्गावर कवितेचा लेसन घ्यायला सांगितले आणि त्यांची शिकवण्याची धाटणी पाहून त्यांची तात्काळ नेमणूकही करून टाकली. २३ जुलै १९३६ रोजी स. वि. कुलकर्णी मो. ह. विद्यालयात शिक्षक म्हणून दाखल झाले आणि पुढे ३६ वर्षे हे नाते टिकले. तेव्हा मो. ह. विद्यालय खारकर आळीच्या टोकाला खाडीवर भरत असे. एन. टी. केळकर आणि एस. व्ही यांनी मिळून मो. ह. विद्यालयाला ठाण्यातील सर्वोत्तम शाळा असा नावलौकीक प्राप्त करून दिला.

मो.ह.मध्ये नोकरी लागली, तेव्हा एस.व्ही. दादरला राहायचे. लोकलने ठाण्याला येताना त्यांच्यासोबत असायचे प्रसिद्ध मराठी साहित्यिक श्री. ना. पेंडसे. ते तेव्हा मो.ह.मध्येच फ्रेंच विषय शिकवायचे. याच पेंडसेंनी मध्यस्थी केली आणि एस.व्हीं.ना जन्माची जोडीदार मिळाली. दादरहून ठाण्याला येणारी मंगला नारायण ओक ही हुशार, गुणी विद्यार्थिनी एस.व्हीं.च्या मनात भरली होती. त्यांची प्रेमकहाणी पेंडसेंच्या मध्यस्थीने सफल झाली. ३० मे १९४० रोजी सरांशी विवाह झाला, तेव्हा मंगला कुलकर्णी म्हणजेच बाई या केवळ मॅट्रिक होत्या. त्यांनी लग्नानंतर आपले पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. सर आणि बाई म्हणजे एकमेकांशी समरस झालेल्या दाम्पत्याचे आदर्श उदाहरण होते.

पुढे एस.व्ही. ठाण्यात राहायला आले आणि स.पां. जोशींशी त्यांचे सूर जुळले. तेव्हा स.पां. स्वतः मो.ह.मध्ये औद्योगिक शिक्षण योजनेत शिकवत असत. नंतर स.पां.नी ठाण्यात साप्ताहिक सुरू करायचे ठरवले, तेव्हा एस.व्हीं.नीच त्याचे 'सन्मित्र' हे बारसे केले. १९५२ मध्ये स.विं.नी आपल्या कोल्हापूरच्या जुन्या, चतुरस्र मित्राला नि. गो. पंडितराव यांना मो.ह.मध्ये शिक्षक म्हणून जोडून घेतले आणि ठाण्याला आणखी एक गुणवंत शिक्षक लाभले. पंडितराव सरांचे अकाली निधन झाल्यानंतर त्यांच्या स्मरणार्थ वक्तृत्व स्पर्धा सुरू करण्यात आणि ती पुढे कायम सुरू



ठेवण्यात एस.व्हीं.चे मोठे योगदान होते.

१९५५ ते ६१ या काळामध्ये एस.व्हीं. ची जनरल एज्युकेशन इस्टिट्यूटच्या कार्यवाहपदी निवड झाली आणि त्यांना दादरच्या छबिलदास हायस्कूलमध्ये दाखल व्हावे लागले. ही कार्यवाहपदाची जबाबदारी एस.व्हीं.नी अतिशय खंबीरपणे आणि कौशल्याने सांभाळली. त्यांची कार्यकुशलता पाहून संस्थेने त्यांना छबिलदासचे मुख्याध्यापक करण्याचे ठरवले. मात्र एस.व्हीं.च्या माजी विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले आणि १९६२ मध्ये एस.व्ही. मो.ह.विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणून ठाण्यात परत आले. शिस्तप्रिय असल्याने कडक स्वभावाचे म्हणून विद्यार्थ्यांमध्ये एस.व्हीं. चा दरारा असला, तरीही त्याच बरोबर ते सगळ्यांचे लाडकेही होते. 'शालेय वार्ता', 'वुई' यांसारखे विद्यार्थ्यांच्या लेखनगुणांना वाव देणारे उपक्रम अस किंवा 'जिज्ञासा मंडळ' सारखे प्रचलि विषयांवरील चर्चा मंडळ असो, त्यां कायम वेगवेगळ्या पद्धतीने आपल विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडवण्याचा प्रयत्न केला. म्हणून तर मुख्याध्याप झाल्यावर आता वर्गावर जाऊन ता घ्यायला कमी वेळ मिळतो अशी ख त्यांनी अनेकदा व्यक्त केली. १९५ मध्ये एस.व्हीं.नी पुढाकार घेऊ मो.ह. विद्यालयाचा माजी विद्याथ संघ स्थापन केला. पुढे याच संघाच्य मदतीने त्यांनी लोकवर्गणी जमा करू मो.ह. विद्यालयात खुले नाट्यगृह बांधल आणि १९६२मध्ये ठाणे शहराला खुले नाट्यगृह मिळाले. १९७२ मध्ये ते मो.ह विद्यालयातून निवृत्त झाले, परंतु उत्तम शिक्षक कधीच निवृत्त होत नाही, या उक्तीप्रमाणे ठाण्यातील नव्याने सुरु झालेल्या श्रीरंग विद्यालयाची सूत्रे त्यांच्याकडे सोपवण्यात आली. १९७७ पर्यंत पाच वर्षे एस.व्हीं.नी मुख्याध्यापक म्हणून आपल्या शैलीत श्रीरंग विद्यालयाची जडणघडण केली.

ठाण्याच्या शैक्षणिक आणि सामाजिक वर्तुळात एस.व्ही. कुलकर्णी यांना एक खास स्थान आणि मान होता. ठाणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्षपद, ठाणे नगरपालिका शिक्षण मंडळाचे सभासदत्व, श्री समर्थ सेवक मंडळाचे शैक्षणिक सल्लागार, ठाणे नगर वाचन मंदिराचे उपाध्यक्षपद अशी अनेक मानाची पदे त्यांनी भूषवली. १९७१ ते ८१ या काळात ते ठाणे स्काउट्सचे ते जिल्हा कमिशनर होते. ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या उभारणीतही त्यांचे योगदान होते. दत्ता ताम्हाणे ट्रस्ट, संस्कृत भाषा सभा, साने गुरुजी कथामाला या संस्थांशी ते जोडलेले होते. सहजीवन फाउंडेशनतर्फे त्यांचा 'विद्याभूषण' हा पुरस्कार देऊन, तर ठाणे महापालिकेतर्फे 'ठाणे भूषण' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला होता. ७ जानेवारी २००३ रोजी एस.व्हीं. नी या जगाचा निरोप घेतला. त्यांच्या स्मरणार्थ ज्ञानसाधना महाविद्यालयातर्फे व्याख्यानमाला आयोजित केली जाते.

(माहिती सौजन्य : ज्ञानसाधना कॉलेज, ग्रंथालय)

पुण्य नगरी

रविवार, २४ जुलै २०२२ । ठाणे

# सीमेवरील जवानांना राख्या पाठवून भगिनी व्यक्त करणार कृतज्ञता

## शुभसंदेशासह राखी देण्याचे आयोजकांनी केले आवाहन

। प्रज्ञा सोपारकर

**ठाणे** : रक्षाबंधन... भावा-बहिणीच्या अतूट नात्याचा सण घरोघरी उत्साहात, आनंदात साजरा केला जातो. मात्र हा सण देशाच्या सीमेवर असलेल्या जवानांना देखील साजरा करता यावा, याकरिता आम्ही शिवभक्त परिवार आणि सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'एक राखी फौजी भाई के नाम' या उपक्रमाचे आयोजन केले आहे. या उपक्रमाअंतर्गत आयोजक संस्थांनी समस्त महिला, भगिनींना सीमेवरील सैनिकांना राख्या शुभसंदेशासह देण्याचे आवाहन केले आहे.

यंदा या उपक्रमाचे तिसरे वर्ष आहे. २०२० मध्ये सुरू झालेल्या या उपक्रमाला पहिल्या वर्षी तुरळक प्रतिसाद मिळाला होता. मात्र गेल्या वर्षी या उपक्रमाअंतर्गत २ हजार ४७० राख्या या सीमेवरील जवानांना शुभसंदेशासह पाठवण्यात आल्या होत्या. मात्र यंदा १० हजार राख्या सीमेवरील जवानांना पाठवण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला आहे. या उपक्रमासाठी सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे एनसीसी, एनएसएस विभागाचे विशेष सहकार्य मिळते. येत्या २५ जुलै ते ५ ऑगस्ट या कालावधीत समस्त महिला-भगिनी यांना जवानांसाठी सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात राख्या आणून देण्याचे आवाहन आम्ही शिवभक्त परिवार यांनी केले आहे.



पोलीस, सीमेवरील जवान हे संरक्षण करून आपले कर्तव्य बजावत असतात. त्यामुळे सण साजरे करताना या बांधवांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दोन वर्षांपूर्वी पोलीस स्टेशनला जाऊन पोलिसांना राख्या बांधण्यात येत. मात्र अनेक संस्था पोलीस बांधवांपर्यंत राख्या पोचवतात. त्यावेळी देशाचे संरक्षण करणाऱ्या जवानांना राख्या पाठवून यानिमित्ताने त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करूया ही संकल्पना पुढे आली. त्यातून या उपक्रमाची सुरुवात झाली. या उपक्रमाला चांगले सहकार्य मिळत असून अनेक भगिनी सैन्यातील जवानांना राखी पाठवण्यासाठी पुढाकार घेतात, अशी माहिती आयोजकांनी दिली.

> गेल्या वर्षी आम्ही जवानांना राख्या पाठवल्या, नंतर त्यांनी स्वतः राखी पाठवलेल्या भगिनींना फोनवरून संपर्क करून आनंद व्यक्त केला. संस्थेच्या माध्यमातून गडकिल्ल्याचे संवर्धन, गरजूंना शैक्षणिक साहित्य वाटप करतो. पण राखी पौर्णिमेच्या निमित्ताने सीमेवरील जवानांना आम्ही राखी पाठवून त्यांना सणाचा आनंद देऊ शकलो, याचे एक वेगळे समाधान मिळाले.
>
> – दीपेश दळवी आम्ही शिवभक्त परिवार

> सैनिक हे देशाच्या सीमांचे रक्षण करतात म्हणून आपण सण साजरे करू शकतो. त्यामुळे त्यांच्याविषयी या उपक्रमातून आपण आदरभाव व्यक्त करतो. त्याचप्रमाणे ते आपल्या कुटुंबापासून लांब राहतात, त्यामुळे सणाच्या वेळी त्यांना आपल्या बहिणीची उणीव जाणवू नये, त्यासाठी आपण राखी पाठवून या सैनिकांना सणाच्या निमित्ताने आनंद देण्यासाठी हा उपक्रम आम्ही शिवभक्त परिवार यांच्यासोबत करतो.
>
> – कमलेश प्रधान सचिव, सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे

लोकमत
मुंबई, बुधवार, दि. २७ जुलै २०२२

ज्ञानसाधना महाविद्यालय, आम्ही शिवभक्त परिवार संस्थेचा उपक्रम

# एक राखी फौजी भाई के लिए... जवानांना राखी पाठविणार !

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** देशाच्या सीमेचे रक्षण करणाऱ्या जवानांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तसेच, भावा-बहिणीतील असलेल्या प्रेमळ नात्याचा आनंद त्यांना घेता यावा यासाठी रक्षाबंधनानिमित्त 'एक राखी फौजी भाई के लिए' हा उपक्रम राबविला जाणार आहे. सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय आणि आम्ही शिवभक्त परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमासाठी पुढाकार घेण्यात आला आहे.

बहीण-भावाच्या अतूट नात्याचा सण रक्षाबंधन १५ दिवसांवर येऊन ठेपला आहे. हा सण देशभर साजरा केला जातो. परंतु या सणाचा आनंद देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या जवानांना घेता यावा आणि देशाचे रक्षण करणारे जवान हे आपले बांधव आहेत या भावनेतून ठाणे आणि परिसरातील तरुणी तसेच, महिला वर्गाला राखी पाठविण्याचे आवाहन केले आहे. एनएसएस, एनसीसी आणि दी एक्सपिडर या विभागांचे या उपक्रमाला सहकार्य आहे. ज्यांना महाविद्यालयात येऊन राख्या पाठविण्यास जमणार नाहीत त्यांच्या घरी जाऊन राख्यांचे संकलन केले जाणार आहे. हा उपक्रम ठाण्यातील तरुण मंडळींनी हाती घेतला आहे. नागपूर, नाशिक आणि मुंबई कॅम्पमध्ये ही तरुण मंडळी स्वतः जाऊन राख्या देणार आहेत. तसेच, या कॅम्पमधील जवान हे इतर कॅम्पमधील जवानांसाठी राख्या पोहोचविणार आहेत. कर्नल अनिल कदम हे या उपक्रमाला सहकार्य करीत आहेत. गेल्या वर्षी २४०० राख्या जवानांपर्यंत पोहोचविण्यात आल्या होत्या.



रक्षाबंधनानिमित्त दरवर्षी राख्या पाठवण्यात येतात.

आपल्या देशाचे रक्षण करण्यासाठी सीमेवरील जवान हे सहा महिने किंवा एक वर्षाहून अधिक काळ आपल्या घरापासून दूर असतात. त्यांना सण, उत्सव साजरा करता यावा या हेतूने हा उपक्रम हाती घेतला आहे. महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थिनींनी या जवानांसाठी राख्या पाठविल्या तर भावाला बहिणीने राखी पाठविल्यासारखे होईल आणि त्यांनाही या सणाचा आनंद घेता येईल.

**- कमलेश प्रधान**, सचिव, ज्ञानसाधना महाविद्यालय

गेले दोन वर्षे आम्ही पोलिसांना राख्या पाठवित होतो, पण विविध संस्थांच्या माध्यमातून तेथे राख्या येत असतात म्हणून गेल्या वर्षी हा उपक्रम हाती घेतला.

**- दीपेश दळवी**, 'आम्ही शिवभक्त'

या उपक्रमासाठी आमची पूर्ण टीम सज्ज झाली आहे. महाविद्यालयातून गवर्षी ७०० राख्या जवानांसाठी पाठवल्या.

**- रोहन पाळारे**, फिल्ड ऑफिसर, द एक्सपिडर

लोकमत

epaper.lokmat.com
मुंबई, गुरुवार, दि. २८ जुलै २०२२

# कारगिल विजय दिन 'ज्ञानसाधना'त साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना युनिट (एनसीसी मुले व मुली) व राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी महाविद्यालयात कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी हुतात्मा जवानांना श्रद्धांजली अर्पण केली.

पथनाट्याद्वारे कारगिल युद्धात, लढाईत हुतात्मा झालेल्या वीरांच्या आठवणी जागविल्या. यावेळी २६ जुलै १९९९ ला भारतीय जवानांनी कारगिल युद्धात मिळविलेला विजय कारगिल विजय दिवस म्हणून साजरा केला जातो. यामुळे भारतीय सैन्यदलातील जवानांचा त्याग यानिमित्ताने पुढच्या पिढीला समजतो.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांनी भारत-पाकिस्तान यांच्यातील कारगिल युद्धाची माहिती दिली. तसेच, या युद्धात ५०० हून अधिक सैनिकांना वीरमरण आले होते. त्यांच्या स्मृतींना यावेळी उजाळा देण्यात आला. महाविद्यालयाच्या उपप्राचार्या मृणाल बकाणे आणि इतर प्राध्यापक, राष्ट्रीय छात्र सेनेच्या व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी मानवंदना अर्पण केली. या कार्यक्रमात एनसीसी कॅडेट्स, एनएसएस स्वयंसेवक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालयातील इतर विद्यार्थी सहभागी झाले होते.

लेफ्टनंट प्रा. दिलीप वसावे, माजी विद्यार्थी रोहन पठारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाची यशस्वीरीत्या सांगता झाली.

सकाळ मुंबई, गुरुवार, २८ जुलै २०२२




**ठाणे :** ज्ञानसाधना महाविद्यालयात कारगिल विजय दिन साजरा करण्यात आला.

# ज्ञानसाधना महाविद्यालयात कारगिल विजय दिन साजरा

ठाणे, ता. २७ (बातमीदार) : ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना युनिट आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने २६ जुलै रोजी कारगिल विजय दिन साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी वीर जवानांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्याप्रती कृतज्ञेची भावना व्यक्त केली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे, उपप्राचार्या बकाने आणि इतर प्राध्यापकांनी उपस्थित राहून वीर जवानांना श्रद्धांजली अर्पण केली.

प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांनी भारत-पाक यांच्यात कारगिल येथे झालेल्या युद्धात भारतीय सैन्याने पाकिस्तानी सैन्याला कसे सोडेतोड उत्तर दिले, याविषयी विवेचन केले. तसेच या युद्धात ५०० हून अधिक सैनिकांना वीरमरण आले. त्या वीरमरण आलेल्या वीरांची गाथा सांगून गतस्मृतींना उजाळा दिला. या कार्यक्रमात एनसीसी कॅडेट्स, एनएसएस स्वयंसेवक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि महाविद्यालयातील अन्य विद्यार्थी सहभागी झाले होते.

लोकमत , सोमवार, दि. १ ऑगस्ट २०२२

# ठाण्यात विद्यार्थ्यांनी जाणून घेतले रानभाज्यांचे आरोग्यविषयक महत्त्व

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** आरोग्यास भरपूर फायदेशीर असणाऱ्या रानभाज्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांनी जाणून घेतले. निमित्त होते सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात गुरुवारी आयोजित केलेल्या ऊर्जा सेतू या उपक्रमाचे. रोजच्या आहारात या रानभाज्यांचा समावेश कधीच नसतो, अशी कबुलीही महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दिली.

विविध संस्थांनी त्यांचे स्टॉल लावले होते. पर्यावरण दक्षता मंडळाने लावलेल्या स्टॉलमधून रानभाज्यांचे महत्त्व महाविद्यालयाच्या अनेक विद्यार्थ्यांनी जाणून घेतले. अळू, पिंपळ, कुर्डू, मुसळी, दिंडा, माठ, आघाडा, शेकटा, केना, भुई आवळा, आंबूशी, टांकळा, शतावरी, भोकर, कंद, लोत या भाज्या स्टॉलवर होत्या. त्यानंतर विश्वास गतिमंद केंद्र, जागृती पालक संघटनेतील दिव्यांग मुलांनी कलाकुसरीने बनविलेल्या राख्या, पिशव्या, फुले, हँडबॅग यासारख्या अनेक वस्तूंनीही लक्ष वेधून घेतले. श्रीपाद आगाशे यांच्या स्टॉलवर नेत्रदानाचे महत्त्व पटवून दिले. तसेच त्यांची पुस्तके विद्यार्थ्यांना मोफत दिली. यात १९ सामाजिक संस्था आणि पाच लघुउद्योजकांनी स्टॉल लावले होते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही स्टॉल लावले होते. या उपक्रमाचे यंदाचे पाचवे वर्ष होते. कोरोनामुळे दोन वर्षे या उपक्रमात खंड पडला होता.



स्टॉलवर असलेल्या पदार्थांची माहिती घेताना विद्यार्थी.

रानभाज्यांबाबत लावलेल्या स्टॉलमधून खूप छान माहिती मिळाली. या भाज्या पहिल्यांदा पाहिल्या. त्या श्रावणात का खातात आणि शरीरासाठी त्याचे काय फायदे आहेत हे जाणून घेण्याची संधी मिळाली.

**- मयूरी निकम,** विद्यार्थिनी

ऊर्जा सेतू उपक्रमातल्या स्टॉलवरुन खूप चांगली माहिती मिळाली. असे उपक्रम वारंवार व्हावेत.

**- पूजा यादव,** विद्यार्थिनी

लोकमत , सोमवार, दि. १ ऑगस्ट २०२२

# पूजा म्हस्के मुंबई विद्यापीठातून दुसरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील तृतीय वर्ष कला शाखेतील विद्यार्थिनी पूजा म्हस्के हिने अर्थशास्त्र विषयात मुंबई विद्यापीठात दुसरा क्रमांक पटकावला आहे. विद्यापीठाने तिला २०२१ सालचा डॉ.लक्ष्मीनारायण के. मुंद्रा भारतीय स्मृती पुरस्कार देऊन गौरविले आहे, या पुरस्काराबरोबरच रु. १०,००० रोख पारितोषिक मिळाले आहे.

यानिमित्त संस्थेचे अध्यक्ष सतीश प्रधान, सचिव कमलेश प्रधान, प्राचार्य डॉ.गणेश भगुरे, उपप्राचार्या डॉ.संज्योत देऊस्कर, प्रशासकीय उपप्राचार्य डॉ.भूषण लांगी यांनी तिचे कौतुक केले. पूजा हिने अर्थशास्त्रात मिळवलेल्या उल्लेखनीय यशाबद्दल शिक्षकांना श्रेय देताना त्यांच्या मार्गदर्शनामुळेच हे शक्य झाल्याचे सांगितले.

महाराष्ट्र टाइम्स
। मंगळवार, २ ऑगस्ट २०२२

# पूजा म्हस्के विद्यापीठात दुसरी

म. टा. वृत्तसेवा, ठाणे

ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील तृतीय वर्ष कला शाखेतील विद्यार्थिनी पूजा म्हस्के हिने अर्थशास्त्र विषयातून मुंबई विद्यापीठात दुसरा क्रमांक पटकावला आहे. विद्यापीठाने तिला २०२१ सालचा डॉ. लक्ष्मीनारायण के. मुंद्रा भारतीय स्मृती पुरस्कार देऊन गौरविले आहे. या पुरस्काराबरोबरच तिला दहा हजार रुपये रोख पारितोषिक मिळाले आहे. यानिमित्त संस्थेचे अध्यक्ष सतीश प्रधान, सचिव कमलेश प्रधान, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे, उपप्राचार्या डॉ. संज्योत देऊस्कर, प्रशासकीय उपप्राचार्य डॉ. भूषण लांगी यांनी तिचे कौतुक केले.



04 AUG 2022

लोकमत

# प्रवेशासाठी शिफारशी नाहीत!

## पूर्वीसारखे चित्र आता दिसत नसल्याचे ठाण्यातील प्राचार्यांनी व्यक्त केले मत

प्रज्ञा म्हात्रे
लोकमत न्यूज नेटवर्क

ठाणे : बऱ्याच प्रतीक्षेनंतर आता सर्वच शहरांत अकरावी प्रवेशाची लगबग सुरू झाली आहे. ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया असल्याने प्रवेशासाठी नेत्यांच्या शिफारसी पूर्वीसारख्या आता येत नाहीत, असे येथील विविध महाविद्यालयांमधील प्राचार्यांनी सांगितले.

दहावीचा निकाल लागल्यानंतर अकरावी प्रवेशाची लगबग सुरू होते. दरवर्षी अकरावी ऑनलाइन प्रवेशासाठी असलेल्या हजारो जागा रिक्त राहतात. तरीही यंदा अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात जागांची वाढ झाली आहे. निकाल लागल्यानंतर अकरावीच्या प्रवेशाकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले होते. महिनाभरानंतर अकरावी प्रवेशाची प्रक्रिया जाहीर झाली. दरम्यान, निवडलेल्या करिअरसाठी कोणत्या शाखेकडे जायचे याबद्दल चर्चा सुरू होती, तज्ज्ञांकडून मार्गदर्शन घेतले जात होते.




**१०१५**
महाविद्यालये मुंबई महानगर क्षेत्रांतर्गत आहेत.

### उपलब्ध जागा

| | |
|---|---|
| कला शाखा | ४८,७३० |
| विज्ञान शाखा | १,२८,६८० |
| वाणिज्य शाखा | १,९८,८६० |

### अकरावी प्रवेशासाठी सध्या शिफारशी नाहीत

अकरावीच्या प्रवेशासाठी कोणत्याही प्रकारच्या शिफारशी सध्या तरी आल्या नसल्याचे केबीपी ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या विमल गोळे यांनी सांगितले.

### ५० टक्के, तरी हवे बेस्ट कॉलेज

कमी टक्के असले तरी विद्यार्थ्यांना बेस्ट कॉलेज हवे असते. कमी टक्क्यांमुळे मनासारखे कॉलेज मिळतेच असे नाही.

### प्रवेश कॉलेजच्या हातात नसतात!

अजून तरी अकरावी प्रवेशासाठी नेत्यांच्या शिफारशी आलेल्या नाहीत. विद्यार्थ्यांचे प्रवेश हे महाविद्यालयांच्या हातात नसते. त्यांनी ऑनलाइन पद्धतीने प्रवेश घ्यायचा असतो. बोर्ड जी नावे कॉलेजला पाठवेल ती भरून घ्यायची एवढीच प्रक्रिया असते.

**- प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक,**
जोशी-बेडेकर महाविद्यालय

ऑनलाइन प्रक्रिया आहे. त्यामुळे शिफारशीने प्रवेश होत नाही. अजून तरी नेत्यांच्या शिफारशी आलेल्या नाहीत. त्यामुळे त्याविषयी सांगता येणार नाही.

**- प्राचार्य डॉ. गणेश भगुरे,** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय

अकरावीची प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाइन असल्याने नेत्यांच्या शिफारशींचा प्रश्नच येत नसल्याचे मत प्राचार्यांनी व्यक्त केले आहे. ऑफलाइन प्रवेश प्रक्रिया असल्याने थोड्याफार प्रमाणात शिफारशी येत होत्या, असेही त्यांनी सांगितले. आता पूर्ण प्रक्रिया ही ऑनलाइन असल्याने विद्यार्थीच त्यांच्या प्रवेश प्रक्रिया पूर्ण करीत असतात. यंदा वाणिज्य शाखेच्या जास्त जागा असल्याचे दिसून येत आहे.

लोकमत
शुक्रवार १२.०८.२०२२

ठाण्यातील तरुणांनी दिली रक्षाबंधनाची भेट

# वीर जवानांपर्यंत राख्यांच्या माध्यमातून पोहोचविला बहिणींच्या मायेचा अतूट धागा

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** देशाच्या सीमेचे रक्षण करणाऱ्या जवानांपर्यंत गुरुवारी ठाण्यातील तरुणांनी राख्या पोहोचवून त्यांना रक्षाबंधनाची अनोखी भेट दिली. भावा-बहिणीतील प्रेमळ नात्याचा आनंद त्यांनाही घेता यावा म्हणून 'एक राखी फौजी भाई के लिए' या उपक्रमांतर्गत संकलित करण्यात आलेल्या तब्बल दीड हजार राख्या ठाण्यातील तरुणांनी एकत्रित जीआरसी आर्मी कॅम्प, कामटी, नागपूर येथील जवानांपर्यंत पोहोचविल्या. इतकेच नव्हे तर ज्या भगिनींनी या राख्या पाठविल्या होत्या. त्यांच्याशी या जवानांनी फोनच्या माध्यमातून संवाद साधला.

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय आणि आम्ही शिवभक्त परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमासाठी पुढाकार घेण्यात आला. भावाबहिणीचे अतूट नाते जपणारा हा सण देशभरात उत्साहाने साजरा केला गेला.



'एक राखी फौजी भाई के लिए' या उपक्रमांतर्गत दीड हजार राख्या ठाण्यातील तरुणांनी एकत्रित नागपूर येथील जवानांपर्यंत पोहोचविल्या.

सीमेवरील जवानांना या सणाचा आनंद राख्यांच्या माध्यमातून ठाण्यातील तरुणांनी दिला. आम्ही शिवभक्त परिवाराचे अध्यक्ष दीपेश दळवी यांच्या नेतृत्वाखालील टीम बुधवारी रात्री सर्व भगिनींच्या राख्या घेऊन नागपूर कॅम्पला रवाना झाली. गुरुवारी सकाळी तेथे पोहोचून या कॅम्पमधील जवानांना राख्या देण्यात आल्या.

त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता, असे दळवी यांनी सांगितले.

> आपल्या देशाचे रक्षण करणाऱ्या या सैनिकांमुळेच आपण सुरक्षित आहोत व सर्व सण आनंदाने साजरे करतो. या उपक्रमाच्या माध्यमातून मिळणारा आनंद शब्दांत व्यक्त करू शकत नाही. यापुढेही सैनिकांसाठी काही वेगळे उपक्रम करता येतील का, यासाठी प्रयत्न करू.
>
> **- दीपेश दळवी,**
> आम्ही शिवभक्त परिवार, महाराष्ट्र

या उपक्रमासाठी माजी कर्नल अनिल कदम, कर्नल नवीन जोशी, बीएचएम गंगाधर, एसएम बी. के. सिंग यांचे सहकार्य मिळाले. या उपक्रमासाठी रत्नागिरी, पुणे, नाशिक, ठाणे, मुंबई येथील भगिनींनी राख्या पाठविल्या होत्या.

ठाणेवैभव

शुक्रवार १२ ऑगस्ट २०२२

# ज्ञानसाधना महाविद्यालयात विद्यार्थी-शिक्षकांचा फ्रेंडशिप डे





**ठाणे:** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात अनोख्या पद्धतीने 'फ्रेंडशीप डे' साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत 'सायन्स असोसिएशन' आणि 'बिईंग मी' समितीच्या संयुक्त विद्यमाने सोमवार 8 ऑगस्ट, 2022 रोजी इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'लक्ष्य' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

आपले लक्ष्य यशस्वीपणे गाठण्यासाठी मानसिक आरोग्य उत्तम ठेवणे आवश्यक ठरते, हा प्राची दळवी यांच्या व्याख्यानाचा आशय होता. व्यक्तिमत्त्व विकास घडवण्यास स्वतःची मनोभूमिका सर्वोत्तम भूमिका निभावते, ध्येय निश्चित करताना ते मनापासून निश्चित केल्यास आपोआपच आपण त्याचा ध्यास घेतो, असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनात सायन्स असोसिएशन प्रमुख डॉ.अंजली जाधव, उपप्रमुख प्रा.कविता भोसेकर, कनिष्ठ महाविद्यालयातील 'बिईंग मी' समिती समन्वयक प्रा.महेश कुलसंगे, प्रा.दिपाली शिंतुत, प्रा.विमल पाटील, प्रा.शीतल मोरे, प्रा.झिया खान, प्रा.पूनम शिंदे, प्रा.राखी जाधव, यांनी मोलाची भूमिका निभावली.

सदर कार्यक्रमाचे आयोजन उपप्राचार्य प्रा. सीताराम वाहुळे, पर्यवेक्षिका प्रा.चारुलता देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. विज्ञान शाखाप्रमुख प्रा.सुरेश हलबांडगे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यार्थी तसेच शिक्षकांचे अमोल नाते घट्ट करण्यासाठी फ्रेंडशीप बँड देऊन मैत्रबंधनात बांधण्यात आले.

विद्यार्थी हा महाविद्यालयाचा केंद्रबिंदू असून, त्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे हे महाविद्यालयाचे आद्य कर्तव्य आहे हे सांगतानाच प्राचार्य डॉ.गणेश भगुरे यांनी सायन्स असोसिएशनला शुभेच्छा दिल्या, तर संस्थेचे कोषाध्यक्ष सतीश शेठ यांनी अनेक उदाहरणांच्या साहाय्याने ध्येय साध्य करताना, ध्येयाचा पाठलाग करताना उत्तम मानसिक स्थितीचे महत्त्व विशद केले. यावेळी लाईफस्टाईल कोच प्राची दळवी यांनी काही प्रात्यक्षिकांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना मानसिक स्वास्थ्याचे महत्त्व पटवून दिले.

मानसिक स्वास्थ टिकवून ठेवताना भोवतालच्या प्रतिकूल परिस्थितीचा आपल्यावर होणारा परिणाम विशद करतानाच मनोवृत्तीचे महत्त्व आपल्या सहजसंवादातून त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले.

ठाणेवैभव

१३ ऑगस्ट २०२२

# मुंबई विद्यापीठाच्या युथ फेस्टिव्हलमध्ये पुन्हा एकदा एसएसटीचा डंका



**कल्याण :** विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी मुंबई विद्यापीठातर्फे युथ फेस्टिवलचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. या फेस्टिवलमध्ये विविध स्पर्धा घेण्यात येतात. त्यातील ठाणे येथील झोनल राऊंड मध्ये नुकत्याच झालेल्या परफॉरमिंग आर्ट्सच्या स्पर्धांमध्ये एसएसटी महाविद्यालयाने दरवर्षीप्रमाणे यंदाही आपले वर्चस्व कायम राखले.

यामध्ये जवळपास 50 पेक्षा जास्त महाविद्यालयातील सुमारे 1500 विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यात 14 स्पर्धा पैकी 9 स्पर्धांमध्ये एसएसटी महाविद्यालयाने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले. यात मिमिक्री मध्ये द्वितीय क्रमांक वैभवी अहिरराव, एकपात्री अभिनय व्दितीय क्रमांक मनीष हटकर, एकांकिका (गट क) व्दितीय क्रमांक आयुष रस्तोगी, गुड्डी पोळेकर, वैभवी अहिरराव, एकांकिका नाटक (गट अ) तृतीय क्रमांक श्रद्धा अहिरे, मनीष हटकर, सिद्धेश मोरे, संदिप भिल यांनी मिळवला. स्किट (गट क)तृतीय पारितोषिक नरपत लखारा, वैभव सोनवणे, सुनील तिघुले, योगेश ठाकूर, विशाखा आढाव, दीक्षिता कोंतम, स्किट (गट अ)द्वितीय पारितोषिक सिद्धेश मोरे, सुनील तिघुले, योगेश ठाकूर, ललित अहिरे, विशाखा आढाव तर वेस्टर्न व्होकल सोलो मध्ये उत्तेजनार्थ बक्षीस प्रथम कांबळे याने पटकावले. वेस्टर्न इंस्ट्रुमेंटल सोलो मध्ये प्रथम पारितोषिक अनिल आहेर, भारतीय समूह गीत मध्ये उत्तेजनार्थ बक्षीस निशिगंधा भंगाळे, श्रेया श्रीनिवास, लावण्य अय्यर, स्वराली बडेकर, जेसन फर्नांडिस,महालक्ष्मी अय्यर यांचा समावेश आहे.

या सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा तुषार वाकसे, प्रा मायरा लच्छानी, प्रा. मयूर माथूर, हर्षल सूर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल एसएसटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ पुरस्वानी, उपप्राचार्य डॉ खुशबू पुरस्वानी आणि सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

ठाणेवैभव ठाणे, शुक्रवार १९ ऑगस्ट २०२२

# ठाणे शहरातील प्रतिष्ठित मान्यवर व्यक्तींचा सत्कार



**ठाणे :** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या प्रांगणात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ज्ञानसाधना, ठाणे सोसायटीचे सचिव कमलेश प्रधान आणि सहसचिव मानसी प्रधान यांच्या संकल्पनेतून ठाणे शहरातील प्रतिष्ठित मान्यवर व्यक्तींचा सत्कार करण्याचे योजिले होते. संस्थेच्या वतीने ठाणे शहरातील सामजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

दिनकर दामले, एस.रामकृष्णन, डॉ.मंजिरी देव, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी भटू सावंत यांचा शाल, श्रीफळ व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. सिग्नल शाळा या ठाणे महानगरपालिकेच्या उपक्रमाला आपल्या कर्तृत्वाने देशभरात ओळख निर्माण करुन देऊन रस्त्यावर राहणाऱ्या व राबणाऱ्या वंचितांना शिक्षणाचा हक्क मिळवून देणारे महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी भटू सावंत, राजकारणापेक्षा समाजसेवेला प्राधान्य देणारे माजी नगरसेवक व समासेवक दिनकर दामले, पीटीआय, युएनआय या वृत्तसंस्थांबरोबरच विविध मराठी व इंग्रजी वृत्तसंस्थांसाठी पत्रकारितेची धुरा कणखरपणे सांभाळणारे एस.रामकृष्णन, ठाणे शहरात गणेश कल्चरल अकादमीच्या माध्यमातून अर्धशतकाहून अधिक वर्षे कथ्थक, भरतनाट्यम नृत्यकलेचा प्रचार व प्रसार करणाऱ्या डॉ.मंजिरी ओक यांचा सन्मान करुन स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करताना मनस्वी आनंद होत असल्याची भावना प्राचार्यांनी व्यक्त केली. हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष व संस्थापक सतीशचंद्र प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव कमलेश प्रधान, सहसचिव मानसी प्रधान, खजिनदार सतीश सेठ, प्राचार्य डॉ गणेश भगुरे उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात सतीशचंद्र प्रधान यांनी ठाणे शहराच्या विकासात चारही मान्यवरांच्या योगदानाचा धावता आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.महेश कुलसंगे तर आभारप्रदर्शन सहायक प्राध्यापक बाबासाहेब कांबळे यांनी केले. सन्मानपत्राचे लेखन प्रा.महेश कुलसंगे यांनी केले. कार्यक्रमाच्या नियोजनात महाविद्यालयाचे सर्व उपप्राचार्य, प्रा.अंजली देशपांडे, प्रा.सिद्धी पाटील, प्रा. तुषार चव्हाण, प्रा.दिलीप वसावे, प्रा.राधिका मुखर्जी, प्रा. हरेश्वर भोये, प्रा.पूजा आवारे, शरद खर्डीकर, सिद्धेश सारंग, राजेश कदम, तांत्रिक बाजू सांभाळणारे प्रशांत कदम आणि विक्की, आकर्षक असे सन्मानपत्र बनवून देणारे श्रीकांत आणि सलील सर, शिक्षेकत्तर कर्मचारी राकेश घडवले, मनोज किलजे, गणेश हवले, अशोक म्हस्के, चंद्रकांत चौधरी, संदीप पवार व इतर सर्व कर्मचारी यांनी मदत केली. सांस्कृतिक कार्यक्रम आणि प्रतिष्ठित व्यक्तींचा सत्कार या कार्यक्रमाचे नियोजन प्राचार्य डॉ गणेश भगुरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. बाबासाहेब कांबळे, प्रा. महेश कुलसंगे यांनी पार पाडले.

ठाणेवैभव

शनिवार २० ऑगस्ट २०२२

# ५५ व्या आंतरमहाविद्यालयीन महोत्सवाची ठाणे विभागीय फेरी संपन्न



**ठाणे :** विद्यार्थी विकास विभाग व ज्ञानसाधना, ठाणे सोसायटीच्या सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने 55 व्या आंतरमहाविद्यालयीन महोत्सवाची ठाणे विभागीय, विभाग-4 फेरी सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात नुकतीच पार पडली.

यावेळी मुंबई विद्यापीठाचे सांस्कृतिक समन्वयक डॉ.निलेश सावे, ठाणे उपकेंद्राचे संचालक डॉ.अद्वैत वैद्य, ठाण्याचे माजी महापौर नरेश म्हस्के प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ठाणे जिल्हा समन्वयक प्रा.अंजली देशपांडे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. उपजिल्हा समन्वयक डॉ.अर्चना प्रभूदेसाई यांनी आभार व्यक्त केले. आम्ही नेहमीच विद्यार्थीकेंद्री उपक्रमांना प्राधान्य देत असतो, मुंबई विद्यापीठाच्या युवामहोत्सवाच्या विभागीय फेरीचे नियोजन करताना आम्ही कुठलीही कसूर केली नाही अशी भावना प्रास्ताविक सादर करताना प्राचार्य डॉ.गणेश भगुरे यांनी व्यक्त केली. मुंबई विद्यापीठाच्या युवामहोत्सवाच्या विभागीय फेरीचे आयोजन करताना मनस्वी आनंद होतोय, ही महाविद्यालयासाठी सन्मानजनक बाब आहे. सर्व प्राध्यापकवर्गाने परिश्रमपूर्वक उत्कृष्ट नियोजन केले आहे. असे प्रतिपादन करत संस्थेचे सचिव कमलेश प्रधान यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.

या महोत्सवात नृत्य, नाट्य, संगीत, गायन अशा तब्बल 19 अनेकविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. यात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही विविध स्पर्धांत निर्भेळ यश मिळवले. हिंदी एकपात्री नाट्यस्पर्धेत सायली प्रधान हिने प्रथम, मराठी एकपात्री नाट्यस्पर्धेत श्रेया मानवी हिने द्वितीय क्रमांक पटकावला. मीम स्पर्धेत समता ब्राम्ही, सानिका देवळेकर, कोमल मयेकर, संजना तठारे, तेजस पवार, अदिती जामधडे यांच्या चमूने प्रथम क्रमांक, समूहगान स्पर्धेत करन कदम, राज मेढेकर, सानिका गोडबोले, कुणाल सोनावणे, सिमरन मंडाल, स्नेहा कुलकर्णी यांच्या चमूने तृतीय, समूहनृत्य स्पर्धेत चैतन्य साळुंखे, ओम राणे, इशा शेलार, गौरी राणे, निलम शिंदे, किर्ती पाटील, प्रतीक घासे, नमन पांडे, ओम सावन, सौरभ शिंदे यांच्या चमूने तृतीय क्रमांक पटकावला. हिंदी मोनोॲक्टींग स्पर्धेत साक्षी मांचेकर हिला उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले.

ठाणे वैभव

दि. ३१/८/2022.

# ठाणे-मुलुंड दरम्यानच्या रेल्वे स्थानकास 'ज्ञानविहार नाव द्या'!



**ठाणे:** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाची चार दशकांची भरीव कामगिरी पहाता ठाणे-मुलुंड दरम्यान होणाऱ्या नियोजित रेल्वे स्थानकास 'ज्ञानविहार' असे नाव द्यावे, अशी सूचना 'ठाणेवैभव'चे संपादक मिलिन्द बल्लाळ यांनी केली.

महाविद्यालयाच्या संस्थापना-दिनी श्री. बल्लाळ बोलत होते. संस्थापक-अध्यक्ष सतीश प्रधान यांचा वाढदिवस असल्याने त्यांचा

➤➤पान २ वर

# ठाणे-मुलुंड दरम्यानच्या रेल्वे स्थानकास 'ज्ञानविहार नाव द्या'!



'देशाने आपल्यासाठी काही केले पाहिजे, यापेक्षा आपण देशासाठी काय करु शकतो याचा विचार तरुण वर्गाने आचरणात आणायला हवा. शैक्षणिक साधना करताना सामाजिक बांधिलकीचे धडे विद्यार्थ्यांनी गिरवायला हवेत,' असे श्री. बल्लाळ म्हणाले.

यावेळी खजिनदार सतीश शेठ, सचिव कमलेश प्रधान यांची भाषणे झाली. प्रा. प्राची बकले यांनी स्वागत केले. सहसचिव सौ. मानसी प्रधान, कार्यकारी मंडळ सदस्य श्री. देवळे आदी यावेळी उपस्थित होते.

यथोचित गौरव यावेळी करण्यात आला.

समाजातील वंचित वर्गाला शिक्षणापासून प्रवाहपतित होऊ द्यायचे नाही या उद्देशाने श्री. प्रधान यांनी या संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. या महाविद्यालयाने केलेल्या नेत्रदिपक कामगिरीमागे तेथील प्राध्यापकांचा सिंहाचा वाटा आहे. एकूण 42 प्राध्यापकांनी डॉक्टरेट मिळवली असून त्यांचे शोधनिबंध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर गौरविले गेले आहेत, असे प्राचार्य गणेश भगुरे यांनी सांगितले. या कार्यक्रमात गुणवंत शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.



ठाणेवैभव बुधवार १४ सप्टेंबर २०२२

## सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचा उपक्रम

# आंतरराष्ट्रीय स्वच्छ हवा दिनानिमित्त कार्यशाळा उत्साहात



**ठाणे:** आंतरराष्ट्रीय स्वच्छ हवा दिवसाच्या निमित्ताने वायू प्रदूषणाच्या पातळीवर लक्ष केंद्रीत करुन सामूहिक उत्तरदायीत्व व सामुहिक कृतीच्या आवश्यकतेबाबत जागृती करणाऱ्या कार्यशाळेचे आयोजन ठाणे महानगरपालिका व सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय यांचेतर्फे संयुक्तपणे ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या सभागृहात नुकतेच करण्यात आले.

महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांच्या आदेशानुसार ठाणे महापालिकेद्वारे या वर्षी 'हवा आपल्या सगळ्यांची' या संकल्पनेस अनुसरुन आंतरराष्ट्रीय स्वच्छ हवा दिवस साजरा करण्यात येत आहे. त्यानुसार, पर्यावरण क्षेत्रातील तज्ज्ञांची व्याख्याने व कार्यशाळा यांचे आयोजन ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील विविध महाविद्यालयांमध्ये करण्यात येत आहे. याच मालिकेत, अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे व उपआयुक्त अनघा कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानसाधना महाविद्यालयात कार्यशाळा व विद्यार्थ्यांसाठी हवा सर्वेक्षणाबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमात सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे विश्वस्त कमलेश प्रधान यांनी पर्यावरण संवर्धन कार्यात महाविद्यालय नेहमीच ठामपास सहकार्य करेल असे आश्वासित केले. प्रास्ताविकामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांनी महाविद्यालयाद्वारे सामाजिक बांधिलकी जपून नियमितपणे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत व शहरातील पर्यावरणीय प्रकल्पांमध्ये ठाणे महानगरपालिकेस नियमितपणे करत असलेल्या सहकार्याबाबत उपस्थितांना माहिती देऊन कार्यक्रमाची सुरुवात केली.

महाविद्यालयातील प्रा. डॉ. आसावरी टाक-शेणवाई यांनी आंतरराष्ट्रीय स्वच्छ हवा दिवसाच्या यावर्षीच्या संकल्पनेस अनुसरुन जागतिक स्तरावरील हवेच्या गुणवत्तेबाबत व हवा प्रदूषणामुळे होणाऱ्या आजारांबाबत विस्तृत माहिती दिली. त्यानंतर ठाणे महानगरपालिकेच्या मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी केंद्र शासनाकडून उपलब्ध अनुदानातून ठाणे महानगरपालिकेद्वारे शहरात राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रीय स्वच्छ हवा कृती आराखड्याबाबत सादरीकरण केले.

ठाणे महानगरपालिकेचे वैज्ञानिक अधिकारी ओम परळकर यांनी हवा प्रदूषण नियंत्रणाबाबत आंतरराष्ट्रीय व देश पातळीवरील कायद्यांबाबत व नागरीकांच्या मूलभूत अधिकारांबाबत सविस्तर सादरीकरण केले. त्यानंतर ठाणे महानगरपालिकेचे वैज्ञानिक अधिकारी राजू जाधव यांनी हवा सर्वेक्षणाकरिता उपलब्ध असलेल्या विविध पद्धती व संसाधनांबाबत सादरीकरण केले. सभागृहातील या कार्यक्रमानंतर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ठाणे महानगरपालिकेच्या फिरती प्रयोगशाळा वाहनामध्ये सर्वेक्षणाबाबतचे प्रत्यक्ष प्रशिक्षण ठामपाच्या क्षेत्र अधिकारी संचिता कडलक यांनी दिले.

'ठाणेवैभव' हे दैनिक मालक-मुद्रक-प्रकाशक मिलिन्द बल्लाळ यांनी मिड-डे इन्फोमिडिया लि., R/847/3, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी रबाळे, महाराष्ट्र -४००६०१ येथे प्रकाशित केले. दूरध्वनी नं. २५३४१५२६,

पुण्य नगरी

, गुरुवार, दि. १५ सप्टेंबर २०२२

# तृतीयपंथीप्रश्नी ज्ञानसाधनात आंतरराष्ट्रीय परिषद

**ठाणे** : तृतीयपंथीयांच्या प्रश्नी एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात २० सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता घेण्यात येणार आहे, अशी माहिती सचिव कमलेश प्रधान यांनी पत्रकार परिषदेत दिली. कवयित्री, स्तंभलेखिका दिशा पिंकी शेख प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. तृतीयपंथीयांच्या समस्येकडे समाज, तसेच देशाने माणुसकीने पाहावे, त्यांनाही माणूस म्हणून सर्व मूलभूत हक्क प्राप्त व्हावे, हे साध्य करण्यासाठी समाजाची आणि एकंदरीत देशाची मानसिकता कशी असावी, यासंदर्भात राष्ट्रस्तरावर विचारमंथन व्हावे, या उद्देशाने परिषदेचे आयोजन केल्याचे त्यांनी सांगितले. बिइंग मी समितीने तृतीयपंथीयांच्या विकासासाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, एल.जी.बी.टी.क्यू.आय.ए+ समुदायातील सदस्य, एल.जी.बी.टी.क्यू.आय.ए+ समुदायाच्या अधिकारांसाठी काम करणारे शिक्षणतज्ज्ञ, संशोधकांना निमंत्रित केले आहे.

पुण्य नगरी

शुक्रवार, १६ सप्टेंबर २०२२ ठाणे

# प्रज्ञा दया पवार यांना ' गंगाधर गाडगीळ साहित्य पुरस्कार '

**ठाणे** : ज्येष्ठ लेखक गंगाधर गाडगीळ यांच्या स्मृतिदिनानिमित्त कवयित्री, कथाकार प्रज्ञा दया पवार यांना 'गंगाधर गाडगीळ साहित्य पुरस्कार' जाहीर झाला आहे. २५ हजार रुपये, मानपत्र आणि मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. वासंती गंगाधर गाडगीळ विश्वस्त निधीतर्फे दर तीन वर्षांनी हा पुरस्कार देण्यात येतो. पुरस्कारासाठी साहित्यिक निवडण्याची जबाबदारी पॉप्युलर प्रकाशनाकडे असल्याने गुरुवारी गाडगीळांच्या स्मृतिदिनी पुरस्काराची घोषणा पॉप्युलर प्रकाशनतर्फे करण्यात आली.

'गंगाधर गाडगीळ साहित्य पुरस्कारा'साठी मराठी साहित्यात मोलाची भर घालणाऱ्या लेखकाच्या लेखनातील नावीन्य, मौलिकता लक्षात घेतली जाते. मराठी समीक्षा क्षेत्रातले दिग्गज समीक्षक डॉ. सुधा जोशी आणि डॉ. हरिश्चंद्र थोरात यांनी प्रज्ञा दया पवार यांची निवड केली आहे. प्रज्ञा दया पवार यांनी लेखनात, विशेषत्वाने कवितेत दाखवलेले नावीन्य आणि त्यांच्या लेखनाची मौलिकता लक्षात घेऊन या पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. त्यांनी कथा, नाटक या वाङ्मय प्रकारांतही लेखन केले. तरी प्रामुख्याने कवयित्री म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांनी महाविद्यालयीन काळातच लेखनाला सुरुवात केली. 'अंतस्थ' हा त्यांचा पहिला कवितासंग्रह १९९३ साली प्रकाशित झाला. नंतर 'उत्कट जीवघेण्या धगीवर', 'मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा', 'आरपार लयीत प्राणांतिक' आणि 'दृश्यांचा ढोबळ समुद्र' असे त्यांचे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. याशिवाय 'धादांत खैरलांजी' हे नाटक आणि 'अफवा खरी ठरावी म्हणून' हा कथासंग्रहही त्यांच्या नावावर आहे.

महाराष्ट्र टाइम्स

मुंबई । शुक्रवार, १६ सप्टेंबर २०२२ ।

# डॉ. प्रज्ञा पवार यांना गाडगीळ पुरस्कार

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

ज्येष्ठ साहित्यिक गंगाधर गाडगीळ यांच्या स्मृतिदिनानिमित्त कवयित्री, कथाकार डॉ. प्रज्ञा दया पवार यांना गंगाधर गाडगीळ साहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे. वासंती गंगाधर गाडगीळ विश्वस्त निधीतर्फे दर तीन वर्षांनी हा पुरस्कार दिला जातो. पॉप्युलर प्रकाशनाच्या माध्यमातून पुरस्कार विजेत्याची निवड करण्यात येते. गुरुवारी पॉप्युलर प्रकाशनाने यासंदर्भात माहिती दिली.

मराठी साहित्यात मोलाची भर घालणाऱ्या लेखकांच्या लेखनातील नावीन्य, मौलिकता लक्षात घेऊन या पुरस्कारासाठी साहित्यिकांची निवड केली जाते. २५ हजार रुपये, मानपत्र आणि मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. समीक्षक डॉ. सुधा जोशी आणि डॉ. हरिश्चंद्र थोरात यांनी पवार यांची निवड या पुरस्कारासाठी केली. दया पवार यांच्या जन्मदिनी ही बातमी मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. समीक्षेच्या क्षेत्रातील दिग्गज व्यक्तींनी गाडगीळ पुरस्कारासाठी निवड केल्यामुळे स्वतःच्या कविता आणि लेखनाचा मोठा सन्मान झाला, असेही त्यांनी म्हटले आहे. पवार यांनी महाविद्यालयीन काळात लेखनाला सुरुवात केली. त्यांचा अंतस्थ हा पहिला काव्यसंग्रह सन १९९३मध्ये प्रकाशित झाला. याशिवाय इतर काव्यसंग्रह, कथासंग्रह आणि धादांत खैरलांजी हे नाटकही त्यांनी लिहिले आहे.



गंगाधर गाडगीळ यांनी सन १९८३मध्ये वासंती गंगाधर गाडगीळ विश्वस्त निधीची उभारणी केली. सन १९९३मध्ये गाडगीळ यांच्या ७०व्या वाढदिवसाच्या निमित्ताने कल्पना गटमन, अभिजीत गाडगीळ आणि चित्रलेखा गाडगीळ या त्यांच्या तीनही मुलांनी या विश्वस्त निधीत भर घालून गंगाधर गाडगीळ साहित्य पुरस्काराची योजना तयार केली. सन १९९४मध्ये पहिला पुरस्कार श्याम मनोहर यांना प्रदान करण्यात आला होता. गाडगीळ हे पॉप्युलर प्रकाशनाचे पहिले लेखक होते. रामदास भटकळ यांच्याशी त्यांचे नाते लेखक-प्रकाशक या नात्यापलीकडचे असल्याने या पुरस्काराची जबाबदारी पॉप्युलरने घ्यावी, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. गेल्या २८ वर्षांमध्ये नऊ पुरस्कार देण्यात आले असून रत्नाकर मतकरी, विलास सारंग, वसंत आबाजी डहाके, नामदेव ढसाळ, मकरंद साठे, राजीव नाईक, जयंत पवार आणि प्रवीण बांदेकर यांना या पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

THE FREE PRESS JOURNAL | FRIDAY | SEPTEMBER 16, 2022

BRAINSTORMING HOW SOCIETY CAN CHANGE MENTALITY

# Intl LGBTQIA+ convention in Thane college on Sep 20

ABHITASH SINGH
Thane

The Satish Pradhan Dnyanasadhana College (Thane), in collaboration with the Indian Council of Social Science Research (ICSSR), will be organising a one-day international conference – Being Me: Understanding Different Dimension of LGBTQIA+ – community on September 20.

The conference aims to brainstorm how the mentality of society and the country as a whole can be changed so that problems faced by the LGBTQIA+ community are tackled humanely, and to provide all basic rights as human beings to the community.

Kamlesh Pradhan, Being Me advisor and secretary of the organisation said, "Gender diversity is natural but the LGBTQIA+ community faces constant discrimination due to their identity as a 'sexual minority'. This conference seeks to bring about positive change in the negative attitudes of all stakeholders in academia and society towards gender diversity." The conference will focus on the discrimination faced by the community and raise awareness of the need for diversity.

"It will sensitise the youth to welcome sexual diversity. Abnormal gender diversity will help in self-advancement and empowerment of those who have been ostracised by society," he added.

**Academicians, researchers, doctors, psychologists and policy-makers will share their experiences**

Mansi Pradhan, joint secretary of the organisation said, "From 2020-21, 'Being Me' has taken up a 5-year project to change the prevailing negative mindset towards gender diversity into a positive one. The conference organised under this project will be used for equality at the national level." Pradhan added that former mayor of the Thane Municipal Corporation (TMC) Naresh Mhaske has extended support to promote the conference. Being Me has also roped in third parties including NGOs, corporate professionals and members of the LGBTQIA+ community.

Practicing academicians, researchers, doctors, psychologists and policy-makers are invited to share their experiences, self-study and insights gained. "Being Me aims to set new standards for this community in education, health and employment," she said.

The conference will be held at the Satish Pradhan Dnyanasadhana College's audio-visual room at 10 am on September 20. Disha Pinky Shaikh, known as an LGBT and Dalit rights activist, poet and columnist, will be the keynote speaker. To conclude the conference, there will be success stories of people from various fields.

महाराष्ट्र टाइम्स । मुंबई । शनिवार, १७ सप्टेंबर २०२२

# भिन्नलिंगी समुदायांची परिषद

**ठाणे** : तृतीयपंथी, समलिंगी, उभयलिंगी या विशिष्ट समुदायांचे प्रश्न, त्यांचे मूलभूत हक्क, त्यांचे अधिकार याविषयी सविस्तर चर्चा घडवून आणण्यासाठी सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेजच्या वतीने मंगळवार, २० सप्टेंबर रोजी एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद होणार आहे. सकाळी १० ते संध्याकाळी



५ दरम्यान विविध सत्रांमध्ये ही परिषद होईल. नैसर्गिकपणे असलेल्या या लिंगवैविध्याला समाजमान्यता मिळावी, याबाबतीत जनसामान्यांमध्ये जनजागृती व्हावी, हा या परिषदेचा हेतू आहे. तृतीयपंथीयांच्या समस्या दूर करण्यासाठी कार्यरत असणाऱ्या स्वयंसेवी आणि संशोधन संस्थांचे प्रतिनिधी आणि अभ्यासक या परिषदेत भाग घेणार आहेत.

रविवार, २५ सप्टेंबर २०२२

महाराष्ट्र टाइम्स

# 'मैडम' ठरली सर्वोत्कृष्ट



**साक्षी जाधव**, साठ्ये कॉलेज

करोनाकाळानंतर म्हणजे दोन वर्षांनी होणाऱ्या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धांमध्ये कॉलेजेस उत्साहानं सहभागी होत आहेत.

विविध स्पर्धेप्रमाणे इप्टा आंतरमहाविद्यालयीन स्पर्धादेखील दिमाखात रंगली. या स्पर्धेची अंतिम फेरी २१ सप्टेंबरला रवींद्र नाट्य मंदिर येथे पार पडली. या स्पर्धेसाठी बेला जयसिंघानी, सुरेश जयराम आणि मकरंद देशपांडे यांनी परीक्षण केलं. या स्पर्धेत कौटुंबिक नातेसंबंध, वस्तुंशी नातं किंवा धार्मिक नातं अशा अनेक नात्यांवर विविध कथानकं सादर झाली.

८० वर्षांपासून कार्यरत असणाऱ्या इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन आयोजित इप्टा आंतरमहाविद्यालयीन हिंदी एकांकिका स्पर्धेचं ४९वं वर्ष जल्लोषात पार पडलं. यंदा सोनी सब आणि पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांच्या सहयोगानं ही स्पर्धा आयोजित करण्यात आली. प्राथमिक फेरीत २१ संघांनी भाग घेत ६ संघ अंतिम फेरीत दाखल झाले.

अंतिम फेरीत स्त्रीशिक्षणाचा वारसा पुढे नेण्यासाठी आणि अशिक्षित आईची आपल्या मुलीला शिकवण्याची धडपड उत्कृष्टरित्या सादर करणाऱ्या सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेजच्या 'मैडम' या एकांकिकेनं बाजी मारत पृथ्वीराज कपूर सन्मानचिन्ह जिंकलं. तर द्वितीय पारितोषिक विजेत्या विवा कॉलेजनं आत्महत्यासारख्या नाजूक विषयावर विनोदी पद्धतीनं भाष्य करत मुलीला पालकांच्या प्रेमाची जाणीव करून देणारी 'एसओएस' एकांकिका सादर केली. या कॉलेजनं मनमोहन कृष्णा सन्मानचिन्ह जिंकलं. देवीप्रसाद गोएंका कॉलेजच्या 'बाप बेटा और वो' या एकांकिकेनं कैफी आझमी सन्मानचिन्हासह सर्वोत्कृष्ट क्रिटिक्स (समीक्षक) हे पारितोषिकही पटकावलं. वडील आणि मुलाचं अनोखं नातं दर्शविणाऱ्या या नाटकानं प्रेक्षकांची मनं जिंकली.

'मैडम' एकांकिकेच्या अजय पाटीलनं सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचा मान मिळवला तर सर्वेश देसाईनं 'जहा सोच वही...' या एकांकिकेसाठी सर्वोत्कृष्ट लेखकाचं पारितोषिक पटकावलं. भावेश पाटील हा सर्वोत्कृष्ट अभिनेता (बाप बेटा और वो) ठरला; तर सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा मान सानिका देवलेकर (मैडम) आणि स्नेहा मुलिक (एसओएस) यांना मिळाला. सर्वोत्कृष्ट अभिनयाचं पारितोषिक संजना काश्रेनं पटकावलं. प्राथमिक आणि अंतिम फेरीतील काही उत्तम कलाकारांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.

लोकमत
बुधवार २१.०९.२०२२

# आशीर्वाद हवेत, मग आम्ही का नको ?

## दिशा पिंकी शेख यांचा सवाल : पारलिंगींच्या आंतरराष्ट्रीय परिषदेला प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

ठाणे : पारलिंगी (एलजीबीटीक्यूए) पाल्याचे संगोपन करताना त्याच्या पालकाला प्रीडित किंवा अपराधी म्हणून पाहिले जाते. कोणत्याही शाळेत समलैंगिक शिक्षण दिले जात नाही. याबाबतीत विद्यार्थ्यांचे पर्यायाने पालकांचे समुपदेशन करणारे समुपदेशक नाहीत. जाती-धर्मापलीकडे पारलिंगी (एलजीबीटीक्यूए) समाजातील एकमेकांना नाते म्हणून स्वीकारतो, तर आमचे कुटुंब का स्वीकारत नाहीत, असा सवाल पारलिंगी आणि दलित हक्क कार्यकर्त्या, कवयित्री, स्तंभलेखिका दिशा पिंकी शेख यांनी केला. आमचे आशीर्वाद सगळ्यांना हवे असतात, पण त्या समाजाला आम्ही नको असतो, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या 'बिइंग मी' या समितीच्या वतीने पारलिंगी समुदायाचा समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलावा यासाठी मंगळवारी आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली होती. यावेळी महाविद्यालयाचे सचिव कमलेश प्रधान, सहसचिव मानसी प्रधान, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे, उपप्राचार्य संज्योत देऊसकर आदी उपस्थित होते.



परिषदेत पारलिंगी आणि दलित हक्क कार्यकर्त्या दिशा पिंकी शेख.

दिशा यांनी पारलिंगी समाज समजून घेण्याची गरज असल्याची अपेक्षा व्यक्त केली. त्या पुढे म्हणाल्या, आमच्या केंद्रस्थानी पालकांनी उभे राहण्यापेक्षा पाठीमागे उभे राहिले तर पुढे होणारे आमचे शोषण थांबेल. आम्हाला काम करण्याचे सल्ले समाजाकडून दिले जातात. पण आम्हाला कोण काम द्यायला तयार नाही. महिलेवर अत्याचार झाला आणि तृतीयपंथीवर झाला तर त्यासाठी तरतूद करण्यात आलेल्या शिक्षेत तफावत आहे. असे का, असा प्रश्न त्यांनी केला. आमच्या समाजासाठी शैक्षणिक, आरोग्य, राजकीय धोरण नाही, अशी खंतदेखील त्यांनी व्यक्त केली. पारलिंगी समाजाच्या आत्महत्या वाढत असून समाजाने याबाबत आत्मचिंतन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

आम्ही जर तृतीयपंथी आहोत तर प्रथम आणि द्वितीयपंथी कोण आहेत, आम्हाला तृतीयपंथी कोणी ठरविले आणि त्याचे मापदंड नेमके काय होते, असा प्रश्न उपस्थित दिशा यांनी करून परिषदेला उपस्थित असलेल्या सर्वांनाच अंतर्मुख केले.

### समाजाने आम्हाला समजून घ्यावे !

दिशा म्हणाल्या की, बाल्य, किशोर, तरुण आणि वृद्धावस्था या चार अवस्थांमधून आणि शिक्षण, समाज, शासन, न्यायव्यवस्था आणि माध्यम या पाच व्यवस्थांमधून पारलिंगी म्हणजेच एलजीबीटीक्यूए समाजाला समजून घ्यावे लागणार आहे. आम्हाला 'इतर'मध्ये टाकण्यात आले आहे आणि इतर म्हणजे शापित, शिवी, अरेरीवीची भावना असल्याने आमच्या पालकांकडे अपराधी म्हणूनच पाहिले जाते, अशा शब्दांत दिशा यांनी नाराजी व्यक्त केली.

ठाणेवैभव

29 SEP 2022

# वावीकर महाविद्यालयाचा वार्षिक उत्सव साजरा





**ठाणे:** महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर वावीकर यांच्या सक्रिय पाठिंब्याने आणि प्रोत्साहनाने, ठाण्यातील वावीकर कॉलेज ऑफ ऑप्टोमेट्रीतर्फे 24 सप्टेंबर 2022 रोजी लॉकडाऊननंतरचा पहिला वार्षिक उत्सव सोहळा साजरा करण्यात आला. ज्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. कर्मचारी आणि दूरवरून आलेल्या पालकांनीही तितक्याच उत्साहात प्रतिसाद दिला.

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश भगुरे आणि भाजपच्या महाराष्ट्र विंगच्या उपाध्यक्षा माधवी नाईक यांनी या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लावली. कॉलेजचे उप-प्राचार्य डॉ. चंद्रशेखर काळे, जे विद्यार्थ्यांचे प्रेरणास्त्रोत आणि साधनसंपन्न मार्गदर्शक आहेत तसेच कॉलेजच्या अत्यंत उपक्रमशील आणि उत्साही संचालिका मीरा कोर्डे यांनीही उपस्थितांना यावेळी मार्गदर्शन केले.

प्रत्येक कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न खूप मोठे असतात असे पाहुण्यांनी नमूद केले. डॉ. गणेश भगुरे आणि माधवी नाईक या दोन्ही मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक आणि प्रमाणपत्रे देऊन विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.आपली संस्कृती, देशभक्ती आणि विविधतेत एकता, लॉकडाऊन आणि त्याचे परिणाम आणि ऑप्टोमेट्रीबद्दलची माहिती यासारखे विषय विद्यार्थ्यांनी चपखलपणे हाताळले आणि मनोरंजनात मोलाची भर पडली. एक भव्य यश मिळण्यासोबतच, या कार्यक्रमाने प्रत्येक वाविकराईट्सला अभिमान वाटावा अशा अनेक कार्यक्रमांचा ठसा उमटवला आहे.

ठाणेवैभव

04 OCT 2022



# सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात रंगला महाभोंडला

**ठाणे:** सतीश प्रधान ज्ञान साधना महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी वर्षभर अध्यापन, मूल्यमापन व इतर अनेक उपक्रमांच्या आयोजनात व्यस्त असतात. या सर्व कामांच्या गर्दीतून अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत कोणतीही बाधा न आणता महाविद्यालयात कार्यरत महिलांसाठी महाभोंडला तसेच सर्व कर्मचाऱ्यांसाठी गरबा रासचे आयोजन करण्यात आले होते.

संस्थेच्या सहसचिव मानसी प्रधान यांच्या नेतृत्वाखाली सर्व कर्मचारीही आपली नित्याची जबाबदारी चोखपणे निभावत कार्यक्रमात सहभागी झाले होते. यावेळी प्रत्येक विद्याशाखांनुसार विविध रंगांची वस्त्रे परिधान करुन आलेल्या प्राध्यापकांमुळे सर्व नवरात्रोत्सवातील नवरंगांचा सुरेख मेळ पहायला मिळाला.

कार्यक्रमाच्या समारोपावेळी संस्थेचे सचिव कमलेश प्रधान, सहसचिव मानसी प्रधान, प्राचार्य डॉ.गणेश भगुरे यांच्या हस्ते उत्कृष्ट सहभागींना प्रोत्साहनपर बक्षीसे देण्यात आली. 'अशा कार्यक्रमांमुळे सर्व सहकाऱ्यांमधील स्नेहबंध दृढ होतातच, त्याबरोबरच संस्थेच्या प्रगतीस पोषक असे एकनिष्ठ व सकारात्मक असे वातावरण तयार होते', अशी भावना यावेळी प्राचार्य डॉ.गणेश भगुरे यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र टाइम्स

। मंगळवार, ४ ऑक्टोबर २०२२

# 'ज्ञानसाधना'मध्ये वक्तृत्व स्पर्धा



**ठाणे :** दरवर्षीप्रमाणे यंदाही ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेजमध्ये 'कै. ग. का. फणसे व कै. इंदिराबाई फणसे स्मृती चषक' कोकण विभागीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा ७ ऑक्टोबर रोजी होणार आहे. स्पर्धेसाठी 'मला राजकारणात जायचंय...!','अमृतमहोत्सव स्वातंत्र्याचा, मागोवा देशस्थितीचा, 'साहित्यिकांची जन्मशताब्दी म्हणजे वाचन महोत्सव', 'आभासी शिक्षणव्यवस्था -सकारात्मक की नकारात्मक','कृत्रिम जगाची वाढती मागणी : प्रगतीची खूण की धोक्याची नांदी' हे विषय आहेत. स्पर्धेचे हे १८वे वर्ष असून सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र आणि पुस्तक देण्यात येणार आहे. विजेत्यांना रोख रक्कम, प्रमाणपत्र आणि फिरता चषक असे पारितोषिकांचे स्वरूप आहे. प्रत्येक सहभागी कॉलेजमधील कमाल दोन विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड आणि पालघर जिल्ह्यातील स्पर्धकांना प्रवास खर्चाची तिकीटे सादर केल्यास ती रक्कम देण्यात येईल. इच्छुक महाविद्यालयांनी https://bit.ly/3RxsS0w या लिंकवर ५ ऑक्टोबरपूर्वी नोंदणी करावी. संपर्क प्रा. हरेश्वर भोये ९७६७६४५७७०, प्रा. महेश कुलसंगे ९०११२७८४८८.

ठाणे, सोमवार १० ऑक्टोबर २०२२

ठाणेवैभव

# सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात वक्तृत्वाचा महायज्ञ

**ठाणे:** दरवर्षीप्रमाणे यंदाही ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात 'कै.ग.का.फणसे व कै.इंदिराबाई फणसे स्मृती चषक' कोकण विभागीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा रंगली. 7 ऑक्टोबर, 2022 रोजी कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'कै.इंदिराबाई फणसे या मथळ्यांतर्गत आयोजित करण्यात आलेली ही स्पर्धा यंदाही अखेरपर्यंत चुरशीची आणि उत्कंठावर्धक झाली.



स्पर्धेत तब्बल 27 महाविद्यालयातील एकूण 42 स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवला होता. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेमध्ये माटुंगा येथील रुइया महाविद्यालयातील आभा भोसले हिने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले तर दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक अनुक्रमे बी.एन.एन महाविद्यालयातील अनन्या म्हात्रे व अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयातील स्वरा सावंत यांनी पटकावले. याव्यतिरीक्त प्रगती अतकरे (महात्मा गांधी विद्यालय व क.महाविद्यालय), सृष्टी बागे (अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय,वसई), रागिनी भोसले (बी.एन.बांदोडकर महाविद्यालय), सृष्टी वडे (मोतीलाल कानजी महाविद्यालय), श्रद्धा बरगे (के. जे.सोमय्या महाविद्यालय) या विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले. बक्षीसपात्र आठ स्पर्धकांमध्ये उस्फूर्त वक्तृत्वस्पर्धा घेण्यात आली. यातून केवळ एका स्पर्धकाची निवड केली जाते. या चुरशीच्या उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धेतही आभा भोसले हिला यश मिळाले.

अशा अत्यंत रोमहर्षक स्पर्धेचे परीक्षण सुप्रसिद्ध अभिनेत्री अतिषा नाईक व प्रसिद्ध लेखिका यामिनी पानगावकर यांनी केले. तरुणांमधून देशहितास आवश्यक विचारसंपन्न वक्ते घडावेत या उदात्त हेतूने सदर वक्तृत्व स्पर्धेची मुहूर्तमेढ रोवली गेली, यंदाचे या स्पर्धेचे 18 वे वर्ष आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाला प्रमाणपत्र व पुस्तक देण्यात येणार आहे. तर, विजेत्यांना रोख रक्कम, प्रमाणपत्र, चषक व फिरता चषक असे पारितोषिकांचे स्वरुप होते.

वक्तृत्व स्पर्धेसाठी यंदा 'मला राजकारणात जायचंय...!', अमृतमहोत्सव स्वातंत्र्याचा, मागोवा देशस्थितीचा, 'साहित्यिकांची जन्मशताब्दी म्हणजे वाचन महोत्सव', 'आभासी शिक्षणव्यवस्था -सकारात्मक की नकारात्मक','कृत्रिम जगाची वाढती मागणी : प्रगतीच्या खूणा की धोक्याची नांदी' अशा विविध विषयांचा समावेश आहे.

वक्तृत्वस्पर्धेत 'प्रत्येक विषयाला असंख्य कंगोरे असतात, त्यामुळे विषयाचा सखोल अभ्यास उत्कृष्ट वक्तृत्वासाठी आवश्यक आहे' असे अभिनेत्री आतिषा नाईक यांच्या मार्गदर्शनपर भाषणातील मर्म होते. स्पर्धेला दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल स्पर्धा प्रमुख प्रा.मनिषा राजपूत सहभागी महाविद्यालये व शिक्षकांचे आभार मानत प्रास्ताविक सादर केले. प्रा. हरेश्वर भोये यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.दिलीप वसावे, प्रा.महेश कुलसंगे यांनी परीक्षकांची ओळख करुन दिली. या स्पर्धेच्या नियोजनात डॉ.वंदना शिंदे, प्रा.कांतीलाल चव्हाण यांनी मोलाची भूमिका निभावली. संस्थेचे अध्यक्ष सतीश प्रधान, सचिव कमलेश प्रधान व प्राचार्य डॉ.गणेश भगुरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.

ठाणेवैभव

ठाणे, मंगळवार ८ नोव्हेंबर २०२२

# तृतीयपंथींच्या सन्मानासाठी ठाण्यात सायकल राईड






**ठाणे** : तृतीयपंथींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आम्ही सायकलप्रेमी फाउंडेशन आयोजित 'एक राईड तृतीयपंथींसाठी-त्यांच्या सन्मानासाठी' ही अनोखी सायकल राईड रविवारी झाली.

या सायकल राईडमधून सायकलप्रेमींनी त्यांच्याप्रति सन्मान व्यक्त केला. त्याचप्रमाणे यावेळी सायकलिंगच्या माध्यमातून फिटनेसचे महत्त्व सांगणाऱ्या 71 वर्षीय माजी पोलीस अधिकारी प्रवीणकुमार कुलथे यांना संस्थेतर्फे, 'ठाणेवैभव'चे संपादक मिलिंद बल्लाळ यांच्या हस्ते 'कृतार्थ जीवन गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि तुळशीचे रोपटे असे या पुरस्काराचे स्वरूप होते. कुलथे यांनी सायकलच्या टायरमध्ये अहंकाराची हवा भरु दिली नाही असे कौतुकोद्गार बल्लाळ यांनी काढले.

पोलीस निरीक्षक विनोद लभडे यांच्या हस्ते झेंडा दाखवून गडकरी रंगायतन येथून सायकल राईडला सुरुवात झाली. तलावपाळी-राम मारुती रोड-गोखले रोड-तीन हात नाका यामार्गे निघालेली ही सायकल राईड सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय येथे झाली. यात 10 वर्षीय मुलांपासून 60 वर्षांच्या आजीबाईपर्यंत सहभागी झाले होते. माय लेकी, पिता-पुत्र, गृहिणी, विद्यार्थी यांचा देखील सहभाग होता.

**“ मिलिंद बल्लाळ हे आपल्या मनोगतात म्हणाले की, केवळ सायकल चालवायची नाही तर त्याला सामाजिक बांधिलकीची जोड द्यायची हा आम्ही सायकलप्रेमी फाउंडेशनचा उद्देश आहे. सायकलवर बसल्यावर सकारात्मकता जाणवते. प्रत्येक माणसाने सायकल चालवली तर तो ग्राउंड रुटेड राहील. प्रत्येक पिढीला जोडणारा दुवा म्हणजे सायकल आणि ही किमया इतर वाहनांमध्ये नाही. सायकल ट्रॅकचा प्रयोग ठाण्यात दुर्दैवाने अपयशी झाला अशी खंत त्यांनी व्यक्त केली.**

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बल्लाळ, सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या विश्वस्त मानसी प्रधान, आनंद विश्व गुरुकुल प्राचार्या डॉ. हर्षला लिखिते, युवा पत्रकार अक्षय भाटकर त्याचप्रमाणे संस्थेचे सेक्रेटरी दिपेश दळवी व्यासपीठावर उपस्थित होते. मुंबईच्या पहिल्या तृतीयपंथी टॅक्सी चालक करीना आडे, किन्नर अस्मिता मंचच्या सदस्य सिमरन सिंग, मुंबई विद्यापीठातील पहिली तृतीयपंथी पदवीधर श्रीदेवी लोंढे यांचा संस्थेतर्फे विशेष सत्कार करुन त्यांना आर्थिक मदत करण्यात आली. यावेळी त्यांनी आम्हाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आमच्या हाताला रोजगार द्या असे आवाहन केले.

सायकलिंगमध्ये योगदान देणाऱ्या चार जणांचा विशेष सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यात कश्मिर ते कन्याकुमारी सायकलवर प्रवास करणारी ठाण्याची 11 वर्षीय सई पाटील, सायकलवर एक लाख किलोमीटर प्रवास करणाऱ्या डोंबिवलीच्या ममता परदेशी, आम्ही सायकलप्रेमी फाउंडेशनकडून प्रेरणा घेऊन तब्बल 22 वर्षांनी सायकल चालविणारे पंकज कुंभार आणि वयाच्या 60 व्या वर्षीही सायकल चालविणाऱ्या दुर्गा गोरे यांचा सत्कार करण्यात आला.

सुरुवातीला संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा प्रज्ञा म्हात्रे यांनी संस्थेचे उद्दिष्ट विषद केले तर सूत्रसंचालन विश्वस्त विकास धनवडे यांनी केले.

मुंबई, मंगळवार,
८ नोव्हेंबर २०२२

सकाळ

# तृतीयपंथींसाठी सायकल राईड

## ठाण्यात आम्ही सायकलप्रेमी फाऊंडेशनतर्फे आयोजन

सकाळ वृत्तसेवा

ठाणे, ता. ७ : तृतीयपंथींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ठाण्यात अनोखी सायकल राईड पार पडली. पोलिस निरीक्षक विनोद लभडे यांच्या हस्ते झेंडा दाखवून गडकरी रंगायतन येथून या सायकल राईडला सुरुवात झाली. तलावपाळी-राम मारुती रोड-गोखले रोड-तीन हात नाका यामार्गे निघालेली ही सायकल राईड सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयपर्यंत धावली. यात १० वर्षीय मुलांपासून ६० वर्षांच्या आजीबाईपर्यंत सहभागी झाले होते. माय-लेकी, पिता-पुत्र, गृहिणी, विद्यार्थी यांचा लक्षणीय सहभाग होता.

आम्ही सायकलप्रेमी फाऊंडेशनतर्फे 'एक राईड तृतीयपंथींसाठी-त्यांच्या सन्मानासाठी' ही अनोखी सायकल राईड रविवारी झाली. या सायकल राईडमधून सायकलप्रेमींनी त्यांच्याप्रति सन्मान व्यक्त केला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मिलिंद बल्लाळ, सतीश प्रधान, ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या विश्वस्त मानसी प्रधान, आनंद विश्व गुरुकुल प्राचार्या डॉ. हर्षला लिखिते, संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा प्रज्ञा म्हात्रे, विश्वस्त विकास धनवडे, पत्रकार अक्षय भाटकर, त्याचप्रमाणे संस्थेचे सचिव दीपेश दळवी व्यासपीठावर उपस्थित होते.

मुंबईच्या पहिल्या तृतीयपंथी टॅक्सीचालक करिना आडे, किन्नर अस्मिता मंचच्या सदस्य सिमरन सिंग, मुंबई विद्यापीठातील पहिली तृतीयपंथी पदवीधर श्रीदेवी लोंढे यांचा संस्थेतर्फे विशेष सत्कार करून त्यांना आर्थिक मदत करण्यात आली. यावेळी त्यांनी आम्हाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आमच्या हाताला रोजगार द्या, असे आवाहन केले आहे.



ठाणे : तृतीयपंथीच्या सन्मानासाठी आयोजित सायकल राईडमध्ये सहभागी झालेले ठाणेकर.

### योगदान देणाऱ्यांचा सन्मान

सायकलिंगमध्ये योगदान देणाऱ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यात काश्मीर ते कन्याकुमारी सायकलव[र] प्रवास करणारी ठाण्याची ११ वर्षीय सई पाटील, सायकलवर एक लाख किलोमीटर प्रवास करणाऱ्या डोंबिवलीच्या ममता परदेशी, तब्बल २२ वर्षांनी सायकल चालवणारे पंकज कुंभार आणि वयाच्या ६० व्य[ा] वर्षीही सायकल चालविणाऱ्या दुर्गा गोरे यांचा सत्कार करण्यात आला.

### ७१ वर्षीय माजी पोलि[स] अधिकाऱ्याचा गौरव

सायकलिंगच्या माध्यमातून फिटनेसचे महत्त्व सांगणाऱ्या ७१ वर्षीय माजी पोलिस अधिकारी प्रवीणकुमार कुलथे यांना संस्थेत[र्फे] ज्येष्ठ पत्रकार मिलिंद बल्लाळ यां[च्या] हस्ते 'कृतार्थ जीवन गौरव' पुरस्क[ाराने] सन्मानित करण्यात आले.

प्रहार
मंगळवार, ८ नोव्हेंबर २०२२

# तृतीयपंथींच्या सन्मानासाठी ठाण्यात सायकल राईड

**ठाणे (प्रतिनिधी) :**

तृतीयपंथींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आम्ही cycle प्रेमी फाऊंडेशन आयोजित 'एक राईड तृतीयपंथींसाठी - त्यांच्या सन्मानासाठी' ही अनोखी सायकल राईड रविवारी संपन्न झाली. या सायकल राईडमधून सायकलप्रेमींनी त्यांच्याप्रति सन्मान व्यक्त केला. त्याचप्रमाणे यावेळी सायकलिंगच्या माध्यमातून फिटनेसचे महत्त्व सांगणाऱ्या ७१ वर्षीय माजी पोलीस अधिकारी प्रवीणकुमार कुलथे यांना संस्थेतर्फे, ज्येष्ठ पत्रकार मिलिंद बल्लाळ यांच्या हस्ते 'कृतार्थ जीवन गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि तुळशीचे रोपटे असे या पुरस्काराचे स्वरूप होते. कुलथे यांनी सायकलच्या टायरमध्ये अहंकाराची हवा भरू दिली नाही, असे कौतुकोद्गार बल्लाळ यांनी काढले.



पोलीस निरीक्षक विनोद लभडे यांच्या हस्ते झेंडा दाखवून गडकरी रंगायतन येथून सायकल राईडला सुरुवात झाली. तलावपाळी - राम मारुती रोड - गोखले रोड - तीन हात नाका यामार्गे निघालेली ही सायकल राईड सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय येथे संपन्न झाली. यात १० वर्षीय मुलांपासून ६० वर्षांच्या आजीबाईंपर्यंत सहभागी झाले होते. माय लेकी, पिता - पुत्र, गृहिणी, विद्यार्थी यांचा देखील सहभाग होता. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बल्लाळ, सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या विश्वस्त मानसी प्रधान, आनंद विश्व गुरुकुल प्राचार्या डॉ. हर्षला लिखिते, युवा पत्रकार अक्षय भाटकर त्याचप्रमाणे संस्थेचे सेक्रेटरी दीपेश दळवी व्यासपीठावर उपस्थित होते.

मुंबईच्या पहिल्या तृतीयपंथी टॅक्सीचालक करिना आडे, किन्नर अस्मिता मंचच्या सदस्य सिमरन सिंग, मुंबई विद्यापीठातील पहिली तृतीयपंथी पदवीधर श्रीदेवी लोंढे यांचा संस्थेतर्फे विशेष सत्कार करून त्यांना आर्थिक मदत करण्यात आली. यावेळी त्यांनी आम्हाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आमच्या हाताला रोजगार द्या, असे आवाहन केले. दरम्यान, सायकलिंगमध्ये योगदान देणाऱ्या चार जणांचा विशेष सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यात कश्मीर ते कन्याकुमारी सायकलवर प्रवास करणारी ठाण्याची ११ वर्षीय सई पाटील, सायकलवर एक लाख किलोमीटर प्रवास करणाऱ्या डोंबिवलीच्या ममता परदेशी, आम्ही cycle प्रेमी फाऊंडेशनकडून प्रेरणा घेऊन तब्ब २२ वर्षांनी सायकल चालविणारे पंकज कुंभार आणि वयाच्या ६० व्य वर्षीही सायकल चालविणाऱ्या दुर्गा गोरे यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा प्रज्ञा म्हात्रे यांनी संस्थेचे उद्दिष्ट विशद केले.

ठाणेवैभव
ठाणे, गुरुवार १० नोव्हेंबर २०२२

### वसंतराव डावखरे व्याख्यानमालेत बद्रिके, म्हात्रे प्रथम

# सध्या फॉरवर्डच्या काळात शब्दांशी नातं तुटतंय : उपाध्ये

**ठाणे :** सध्या फॉरवर्डच्या काळात तरुण पिढीचे शब्दांशी नातं तुटत आहे. दिवंगत वसंतराव डावखरे यांच्या नावाने होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धांच्या माध्यमातून पुन्हा शब्दांशी नाते जोडले जाईल, असे प्रतिपादन भाजपाचे प्रदेश प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी व्यक्त केले.

कै. वसंतराव डावखरे राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या समारोपात उपाध्ये बोलत होते. वरिष्ठ गटात पराग बद्रिके व कनिष्ठ गटात अनन्या म्हात्रे यांनी प्रथम क्रमांक पटकावून प्रत्येकी दहा हजार रुपयाचे बक्षीस जिंकले. विधान परिषदेचे माजी उपसभापती दिवंगत वसंतराव डावखरे साहेबांच्या जयंतीनिमित्ताने समन्वय प्रतिष्ठानतर्फे ठाण्यातील के. बी. पी. महाविद्यालयात भरविलेल्या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचा मंगळवारी समारोप झाला. आमदार निरंजन डावखरे, माजी खासदार संजीव नाईक, भाजपाच्या प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक आणि प्रदेश प्रवक्ते केशवजी उपाध्ये यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली.




या वेळी महापालिकेतील माजी गटनेते मनोहर डुंबरे, प्रसिद्ध लेखक शिरीष लाटकर, भाजपाचे शहर सरचिटणीस विलास साठे, मनोहर सुगदरे, सचिन मोरे आदींची उपस्थिती होती. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे, हर्षदा बोरकर, निर्मोही फडके, मंदार टिल्लू आदींनी काम पाहिले. या स्पर्धेत वरिष्ठ गटात यश पाटील याने द्वितीय, श्रुती बोरस्ते हिने तृतीय आणि विवेक वारभुवन याने उत्तेजनार्थ बक्षीस जिंकले. तर कनिष्ठ गटात द्वितीय क्रमांकावर रागिणी भोसले, तृतीय क्रमांकावर प्रियांका दळवी आणि उत्तेजनार्थ म्हणून मनस्वी माने यांना बक्षीस देण्यात आले.

उत्तम वक्तृत्वासाठी सातत्याने

>>पान २ वर

### वसंतराव डावखरेंनी अनेक वक्ते घडविले

**विधान परिषदेच्या उपसभापतीपदावर कार्य करीत असताना वसंतराव डावखरे यांनी सभागृहातून अनेक यशस्वी वक्ते घडविले. एखादा आमदार चांगल्या पद्धतीने बोलत असल्यास, त्याला ते भाषणासाठी वेळ वाढवून देत असत. तर एखादा सदस्य मुद्यावरुन भरकटला, तर ताबडतोब विषय थांबवत असत. त्यांच्या या पद्धतीमुळे अनेक नवोदीत आमदारांना आत्मविश्वास वाढला होता, अशी आठवण भाजपाचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी सांगितली.**

## सध्या फॉरवर्डच्या काळात शब्दांशी नातं तुटतंय : उपाध्ये

नवनवीन लोकांबरोबर बोलत राहिले पाहिजे. बोलण्याबरोबरच दुप्पट वाचले पाहिजे. तर पाच ते सहापट ऐकले पाहिजे. वक्तृत्वासाठी आत्मविश्वासही महत्वाचा असून, शब्दांची मांडणीही योग्य पद्धतीने करावी, अशी सुचना श्री. उपाध्ये यांनी तरुणांना केली. प्रत्येक भाषणाच्या वेळी आपल्या समोर जनसमुदाय कोणत्या पद्धतीचा आहे. ते ध्यानात घेण्याबरोबरच सखोल अभ्यास करुन भाषण करावे. अशा पद्धतीने तुम्हा वक्तृत्वात यश मिळेल, असे श्री. उपाध्ये यांनी सांगितले.

महाविद्यालयातील तरुण-तरुणींना मनातील विचार व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ देण्याचा मुख्य उद्देश ठेवून स्पर्धा भरविण्यात आली होती. उत्तम वक्तृत्वाच्या माध्यमातून मुलांना भविष्य घडविता येऊ शकते. यापुढील काळातही समन्वय प्रतिष्ठानतर्फे तरुणांच्या प्रगतीसाठी स्पर्धांसह विविध उपक्रम राबविण्यात येतील, असे आमदार निरंजन डावखरे यांनी प्रास्ताविकात सांगितले. या वेळी संजीव नाईक, माधवी नाईक यांचीही भाषणे झाली. आकाश राऊत यांनी सुत्रसंचालन व स्पर्धेचे नियोजन केले.

ठाणे, बुधवार ३० नोव्हेंबर २०२२

ठाणेवैभव

# ठाण्यातील महाविद्यालयीन, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन

**ठाणे :** ठाणे शहरातील विविध महाविद्यालयांतील आणि शालेय विद्यार्थ्यांनी वाणिज्यशास्त्र विषय निवडल्यावर त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक वाटचालीसाठी 'इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल'च्या ठाणे शाखा आणि 'वेस्टर्न इंडिया चार्टर्ड अकाउंटंट्स स्टुडंट्स असोसिएशन'च्या ठाणे शाखेने त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले होते.



हे शिबीर वझे केळकर कॉलेज, सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेज सरस्वती विद्यामंदिर आणि डीएव्ही या शाळांमध्ये योजले होते. याद्वारे 100हून विद्यार्थ्यांना चार्टर्ड अकाउंटन्सी क्षेत्राबद्दल खोलवर माहिती देण्यात आली. सी.ए परीक्षांची रचना, त्यांचा अ•यासक्रम, 'सी.ए'साठी उपलब्ध होणा-या व्यावसायिक संधींबाबत विद्यार्थ्यांचा सर्व प्रश्नांचे निरसन ठाणे 'डब्ल्यूआयआरसी' व 'विकासा'च्या प्रतिनिधींनी केले.

याद्वारे अधिकाधिक विद्यार्थ्यांना 'सीए' क्षेत्राबद्दल अचूक माहिती देण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांच्या 'डब्ल्यूआयआरसी' व 'विकासा'मुळे सफल झाला.

लोकसत्ता

गुरुवार, ८ डिसेंबर २०२२

# ‘लोकसत्ता लोकांकिके’ची विभागीय अंतिम फेरी आज

## गडकरी रंगायतनमध्ये दर्जेदार एकांकिकांचे सादरीकरण

लोकसत्ता प्रतिनिधी

**ठाणे :** समाजातील ज्वलंत प्रश्नांवर परखडपणे मात्र तितक्याच मनोरंजनात्मक पद्धतीने भाष्य करणारे विषय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या दर्जेदार अभिनयाचे सादरीकरण आज रसिक प्रेक्षकांना लोकसत्ता लोकांकिका स्पर्धेच्या विभागीय अंतिम फेरीच्या माध्यमातून अनुभवयाला मिळणार आहे.

ठाणे विभागाची प्राथमिक फेरी नुकतीच झाली असून या फेरीतून निवड झालेल्या पाच एकांकिकांची विभागीय अंतिम फेरी ठाण्यातील गडकरी रंगायतनमध्ये आज, दुपारी ३.३० वाजल्यापासून रंगणार आहे. ज्येष्ठ परीक्षकांनी निवडलेल्या आणि दर्जेदार विषय आणि उत्तम अभिनयाची सांगड असलेल्या या एकांकिका आज रसिक प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.

महाविद्यालयीन विश्वात प्रतिष्ठेची समजली जाणारी अशी ‘लोकसत्ता लोकांकिका’ स्पर्धेची ओळख आहे. दरवर्षी यात सहभाग घेऊन आपल्या अभियानाची आणि दिग्दर्शनाची चुणूक दाखवून देण्यासाठी विद्यार्थी लोकांकिका स्पर्धेची आतुरतेने वाट पाहात असतात. या स्पर्धेची ठाणे विभागाची प्राथमिक फेरी नुकतीच ठाण्यातील सरस्वती शाळेच्या सभागृहात पार पडली. या प्राथमिक फेरीत जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एकाहून एक सरस एकांकिका सादर केल्या. यातील पाच एकांकिकांची निवड विभागीय अंतिम फेरीसाठी करण्यात आली आहे. यामध्ये न्यू पनवेल येथील (पान ४ वर)

### प्रायोजक

लोकसत्ता आयोजित ‘सॉफ्ट कॉर्नर’ प्रस्तुत ‘लोकसत्ता लोकांकिका’ स्पर्धा सहप्रायोजक ‘झी युवा’ आणि ‘टुगेदरिंग’च्या सहकार्याने पार पडणार आहे. ही स्पर्धा पॉवर्ड बाय ‘इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड’, ‘केसरी टूर्स’ आणि ‘मे. बी. जी. चितळे डेअरी’तर्फे आहे. सहाय्य ‘अस्तित्व’चे आहे. लोकांकिकेच्या मंचावरील कलाकारांच्या कलागुणांना चित्रपट, मालिकेत संधी देणारे ‘आयरिस प्रॉडक्शन’ टॅलेंट पार्टनर आहेत.

सॉफ्ट कॉर्नर
स्वप्न मनामनातलं । निसर्गाच्या सान्निध्यातलं ॥
presents
लोकसत्ता लोकांकिका
in association with
ZEE युवा

### अंतिम फेरी

**कधी ?** गुरुवार, ८ डिसेंबर

**केव्हा ?** दुपारी ३.३० वाजल्यापासून

**कुठे?** गडकरी रंगायतन, ठाणे

### प्रवेशिकांसाठी

प्रवेश विनामूल्य. प्रथम येणाऱ्यास प्राधान्य. काही जागा निमंत्रितांसाठी राखीव. प्रवेशिका नाट्यगृहावर प्रयोगापूर्वी अर्धा तासाआधी उपलब्ध.

### विभागीय अंतिम फेरीसाठीच्या एकांकिका

- **डोक्यात गेलंय!,** सतिश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय ठाणे.
- **बिंदी बाजार,** आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय बदलापूर.
- # **फॅम- जॅम,** बि. के. बिर्ला महाविद्यालय (स्वायत्त) कल्याण.
- **असं कधी होत नाही!,** शंकर नारायण महाविद्यालय मीरा- भाईंदर.
- **तुंबई,** सी.के. ठाकूर कॉलेज आर्ट्स, कॉमर्स, सायन्स नवीन पनवेल.

४

# ‘लोकसत्ता लोकांकिके’ची विभागीय अंतिम फेरी आज

**(पान १वरून)** सी. के. ठाकूर महाविद्यालयाची ‘तुंबई’, भाईंदर येथील शंकर नारायण महाविद्यालयाची ‘असं कधी होत नाही’ या एकांकिका आहेत. याबरोबरच कल्याण येथील बी.के. बिर्ला महाविद्यालयाची ‘#फॅमजॅम’, बदलापूर येथील आदर्श महाविद्यालयाची ‘बिंदी बाजार’ तर ठाण्याच्या सतिश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाची ‘डोक्यात गेलंय’ या एकांकिकांनी विभागीय अंतिम फेरीत मजल मारली आहे. या फेरीतून उत्तम विषयांची मांडणी असलेल्या एकांकिका आज रसिक प्रेक्षकांना अनुभवयाला मिळणार आहे.

लोकसत्ता

शुक्रवार, ९ डिसेंबर २०२२

## ठाणे विभागीय अंतिम फेरी

# ज्ञानसाधना महाविद्यालय सरस

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**ठाणे** : उत्तम विषय आणि त्याची मांडणी करण्यासाठी केलेला दर्जेदार अभिनय, अशा पाच एकांकिकांचा समावेश असलेल्या 'लोकसत्ता लोकांकिका'ची ठाणे विभागीय अंतिम स्पर्धेची ठाणे विभागाची प्राथमिक फेरी नुकतीच पार पडली आणि त्यातून पाच दर्जेदार एकांकिकांनी विभागीय अंतिम फेरीत प्रवेश मिळविला होता. या एकांकिकांचे गुरुवारी ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे सादरीकरण झाले. यावेळी ठाणे विभागीय अंतिम फेरीची सुरुवात न्यू पनवेल येथील सी. के. ठाकूर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'तुंबई' या एकांकिकेने झाली. यानंतर कल्याण येथील बिर्ला महाविद्यालयाने 'फॅमजॅम' या एकांकिकेतून एकत्र कुटुंब पद्धती सामाकि विषयावर भाष्य करत प्रेक्षकांना काही काळ सुन्न केले.

यानंतर बदलापूर येथील आदर्श महाविद्यालयाने बिंदी बाजार ही एकांकिका सादर करत महिला आणि समाजातील काही घटकांकडून त्यांच्यावर लादली जाणारी बंधने यावर

सॉफ्ट कॉर्नर

presents

लोकसत्ता लोकांकिका

in association with

ZEE युवा

Togethering

**प्रायोजक**

लोकसत्ता आयोजित 'सॉफ्ट कॉर्नर' प्रस्तुत 'लोकसत्ता लोकांकिका' स्पर्धा सहप्रायोजक 'झी युवा' आणि 'टुगेदरिंग'च्या सहकार्याने पार पडणार आहे. ही स्पर्धा पॉवर्ड बाय 'इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड', 'केसरी टूर्स' आणि 'मे. बी. जी. चितळे डेअरीतर्फे आहे. साहाय्य 'अस्तित्व' चे आहे. लोकांकिकेच्या मंचावरील कलाकारांच्या कलागुणांना चित्रपट, मालिकेत संधी देणारे 'आयरिस प्रॉडक्शन' टॅलेंट पार्टनर आहेत.



लोकसत्ता लोकांकिका स्पर्धेच्या ठाणे विभागीय अंतिम फेरीत ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाची 'डोक्यात गेलंय' ही एकांकिका विजयी ठरली. स्पर्धकांना पारितोषिक वितरित करताना ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अभिनेते मंगेश देसाई, जेष्ठ अभिनेत्री सुहास जोशी, अभिनेत्री आणि दिग्दर्शिका संपदा जोगळेकर- कुलकर्णी, 'सॉफ्ट कॉर्नर'चे दिलीप कुलकर्णी, लेखक- दिग्दर्शक सचिन गोस्वामी, अभिनेते कुशल बद्रिके, दिग्दर्शक विजू माने उपस्थित होते.

> तरुण एकांकिकांच्या माध्यमातून अनेक नवीन विषय घेऊन त्यांची उत्तम पद्धतीने मांडणी करता त्याबाबत अगदी छान वाटते.
> – **सुहास जोशी,** ज्येष्ठ अभिनेत्री

> अंतिम फेरीत चांगली चुरस रंगेल यात शंका नाही. एक आदरणीय प्रसारमाध्यम रंगभूमीसाठी खूप चांगले काम करत आहे.
> – **संपदा जोगळेकर,** अभिनेत्री, दिग्दर्शिका

> एकांकिका पाहताना आताची पिढी राजकीय आणि सामाजिक प्रश्नांकडे अत्यंत सजकपणे पाहते, हे जाणवले.
> – **सचिन गोस्वामी ,** लेखक, दिग्दर्शक

> एकांकिका उत्तम स्पर्धा आहे. नव कलाकारांसाठी आपल्या कलागुणांचे सादरीकरण करण्यासाठी लोकांकिका हे एक उत्तम व्यासपीठ आहे.
> – **दिलीप कुलकर्णी,** सॉफ्ट कॉर्नर

फेरी गुरुवारी मोठ्या जल्लोषात पार पडली. तर, या एकांकिकांमधून ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या 'डोक्यात गेलंय' या एकांकिकेने बाजी मारली. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी, 'सॉफ्ट कॉर्नर'चे दिलीप कुलकर्णी, अभिनेते मंगेश देसाई आणि दिग्दर्शक विजू माने आणि अभिनेते कुशल बद्रिके यांची उपस्थिती होती.

आणि त्यात केवळ संपत्तीच्या हव्यासासाठी एकत्र राहणारे कुटुंब यावर भाष्य करत प्रेक्षकांच्या टाळ्या मिळविल्या. तर, शंकर नारायण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी 'असं कधी होत नाही' या एकांकिकेतून भाष्य केले. तर फेरीच्या अंतिम सादर झालेली आणि अंतिम फेरीत बाजी मारलेल्या सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाची 'डोक्यात गेलंय' या एकांकिकेने समाजमाध्यमांचे वेड यावर मनोरंजनात्मक भाष्य केले.

सॉफ्ट कॉर्नर

presents

लोकसत्ता लोकांकिका

in association with

ZEE युवा

## ठाणे विभागात 'ज्ञानसाधना' सरस

**ठाणे** : लोकसत्ता लोकांकिका स्पर्धेच्या ठाणे विभागीय अंतिम फेरीमध्ये सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाची 'डोक्यात गेलंय' ही एकांकिका अव्वल ठरली. नागपूर विभागामध्ये 'न्यायालयात जाणारा प्राणी' ही विठ्ठलराव खोब्रागडे महाविद्यालयाची एकांकिका सर्वोत्तम ठरली आहे. नाशिक विभागात सौ. स्मिताताई हिरे कॉलेज ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सच्या 'हर्लेक्युईन' या एकांकिकेने बाजी मारली आहे. या एकांकिका मुंबईत होणाऱ्या महाअंतिम फेरीसाठी पात्र ठरल्या आहेत. – **पान १४**

ठाणे, रविवार ११ डिसेंबर २०२२

ठाणेवैभव

# सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**ठाणे:** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात सायन्स असोसिएशन आणि रॅपो बिल्डिंग समितीच्या संयुक्त विद्यमाने आंतरशालेय व आंतरमहाविद्यालयीन प्रशमंजुषा व पी.पी.टी सादरीकरण स्पर्धा 5 व 6 डिसेंबर रोजी यशस्वीपणे पार पडली.

कोरोनानंतर विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक गुणवत्ता थोड्याफार प्रमाणात खालावलेली दिसतेय. विज्ञान व गणित या विषयांवर आधारित आंतरशालेय व आंतरमहाविद्यालयीन प्रश्नमंजुषा व पी.पी.टी स्पर्धा शालेय गट (इयत्ता नववी व दहावी) व कनिष्ठ महविद्यालयीन गट (इयत्ता अकरावी व बारावी) अशा दोन गटात घेण्यात आली. संस्थेचे सचिव कमलेश प्रधान, प्राचार्य डॉ. जी.बी. भगुरे व उपप्राचार्य सीताराम वाहुळे, पर्यवेक्षक प्रा. चारुलता देशमुख, प्रशासकीय उपप्राचार्य दिनेश जोशी, विज्ञान शाखाप्रमुख व स्पर्धा समन्वयक प्रा.सुरेश हलबांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

रॅपो बिल्डिंग समितीप्रमुख प्रा. महेश पाटील, सायन्स असोसिएशन प्रमुख डॉ.अंजली जाधव यांनी सहकारी प्राध्यापकांच्या मदतीने उत्कृष्ट नियोजन केले.

5 डिसेंबर शालेय गटात व 6 डिसेंबर रोजी कनिष्ठ महाविद्यालयीन गटात घेण्यात या आलेल्या स्पर्धेत जवळपास 40 शिक्षणसंस्थांमधील तब्बल 250 विद्यार्थी सहभागी झाले होते. शालेय गटातील पीपीटी स्पर्धेत आदर्श इंग्लिश स्कूल या गटातील विद्यार्थिनी शाहिस्ता अन्सारी या हिने प्रथम पारितोषिक पटकावले, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक अनुक्रमे हॉलिक्रॉस कॉन्व्हेन्ट स्कूल गट (अलिशीया लासरडो व शर्मिका ठोंबरे) आणि अंबर इंटरनॅशनल स्कूल गट (प्रियल बोरसे व जश्न सचदेव) या गटांनी पटकावले. तर, सरस्वती एज्युकेशन हायस्कूल गटाने (वाणी परदेशीया व इशिता दुबे) उत्तेजनार्थ बक्षीस जिंकले.



शालेय गटातील प्रश्नमंजुषा स्पर्धेत हॉलिक्रॉस कॉन्व्हेन्ट हायस्कूल या गटाने (सहरीश मंसुरी, पालक कोठारी, खुशी सलियन, आर्या भदाने) प्रथम पारितोषिक पटकावले, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक अनुक्रमे केईस भगवती स्कूल गट (मिताली नाईक, किमया टिळक, शर्वरी पोंक्षे, ध्रुव पावडे) आणि सरस्वती एज्युकेशन हायस्कूल गट (वेद तलेले, अन्वय देशपांडे, गायत्री घाग, निहरिका ठाकुर) या गटांनी पटकावले. तर, आनंद विश्व गुरुकुल हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज गटाने (अदिती शुक्ला, मनस्वी खोत, अथर्व पारकर, सिद्धांत राऊत) उत्तेजनार्थ बक्षीस जिंकले.

कनिष्ठ महाविद्यालयीन गटातील पीपीटी स्पर्धेत शेठ एन.के.टी महविदियालयीन गटाने (झिल यादव, जान्हवी वारेकर) प्रथम पारितोषिक पटकावले, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक अनुक्रमे आर.जे.ठाकूर महाविद्यालय (खुशी पुंज) आणि न्यू कळवा ज्युनियर कॉलेज गट (याशिरा वाडेकर, मनीषाकुमारी सहानी) या गटांनी पटकावले. तर, रधिकाबाई मेघे ज्यू.कॉलेज गटाने (भावना तिवारी, तन्वी बांदिवडेकर, भूमी विश्वकर्मा) उत्तेजनार्थ बक्षीस जिंकले.

कनिष्ठ महाविद्यालयीन गटातील प्रश्नमंजुषा स्पर्धेत सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयीन गटाने (उज्ज्वल विश्वकर्मा, एकांश मोहिते, साहिल दळवी, बिपिन सहानी) प्रथम पारितोषिक पटकावले, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक अनुक्रमे सावित्रीबाई थिराणी (सुहानी सूर्यवंशी, जान्हवी पाटील, आदित्य जोशी, वीणा माने) आणि सरस्वती एज्युकेशन हायस्कूल गट (श्रेष्ठा सिंग, क्रिषीता नाखवा, निधी मिरजकर, संजना नाईक) या गटांनी पटकावले. तर, न्यू कळवा कॉलेज गट (ओमकार गुजर, केदार साळवी, करन राठोड, स्वप्नील जोगदनकर) उत्तेजनार्थ बक्षीस जिंकले. विजेत्यांना चषक व रोख रक्कम तर सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले.

रविवार, ११ डिसेंबर २०२२ । ठाणे

पुण्य नगरी

# साहित्यिक विश्वात लिंगभावाला थारा नाही - भारत सासणे



। ठाणे : स्त्रियांच्या लेखनाबद्दल बरेच काही बोलले गेले आहे. यासंदर्भात चर्चा करणे आता कालबाह्य व्हायलाच पाहिजे. तथापि अजूनही यासंदर्भात चर्चा होत राहते. लेखनाच्या क्षेत्रात लिंगभावाला थारा देता कामा नये, असे मत ज्येष्ठ साहित्यिक तथा अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष भारत सासणे यांनी व्यक्त केले. प्रख्यात कवयित्री प्रा. डॉ. प्रज्ञा दया पवार यांना यंदाचा गंगाधर गाडगीळ साहित्य पुरस्कार सासणे यांच्या हस्ते शुक्रवारी मराठी ग्रंथसंग्रहालयात प्रदान करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी ज्येष्ठ समीक्षक मीना गोखले, पॉप्युलर प्रकाशनचे प्रकाशक रामदास भटकळ आदी उपस्थित होते.

सासणे पुढे म्हणाले, अलीकडे अनुभवयाला येणाऱ्या नवतुच्छता वादाची सुरुवात स्त्रियांच्या शिक्षित होण्यापासून आणि त्यांच्या लेखनाला स्वरुप प्राप्त होण्याच्या वास्तवापासून झाली आहे. आज नवतुच्छता वाद निर्माण होतोय तो भयकारी अशा अवस्थेला पोहोचलेला आहे. मराठी साहित्यिक वर्तुळाने स्त्रियांच्या हौशेपोटी लिहिलेल्या आणि मनोरंजनात्मक अशा साहित्याची दखल घेऊन टिंगलीचा सूर लावला होता. हा इतिहास काही विसरता येत नाही . स्त्रीमुक्तीच्या एकूण भारलेल्या वातावरणातून काही स्त्री लेखकांनी स्वतःचा वेगळा ठसा उमटवला आणि समीक्षेला गंभीर देखल घेण्यास भाग पाडले. ज्यांनी हे केले त्या अनवट वाटेवरच्या प्रवासी असलेल्या प्रज्ञा पवार या आपली वाटचाल अतिशय सक्षमपणे करत आहेत, असे सासणे यांनी सांगितले.

अलीकडचा काळ तुमच्या मनात आहे ते तुम्ही व्यक्त करा, पण भोवताली जे सुरू आहे, त्याबद्दल तुम्ही व्यक्त झालात तर मात्र योग्य होणार नाही. अशा या प्रकारचा माहोल आहे. लोक मॅनेज होण्याच्या काळामध्ये लेखकाची मौलिकता लक्षात घेऊन हा पुरस्कार दिला जातो. त्यामुळे पॉप्युलर प्रकाशनच्या वतीने मला पुरस्कार देण्यात आला. त्यासाठी मी कृतज्ञता व्यक्त करते. पुरस्कार मिळणे ही पोचपावती आहे आणि एक मोठी जबाबदारी असल्याची भावना प्रज्ञा पवार यांनी व्यक्त केली. याप्रसंगी ज्येष्ठ समीक्षक मीना गोखले, रामदास भटकळ यांचीदेखील मार्गदर्शनपर भाषणे झाली.

रविवार ११.१२.२०२२

लोकमत

भारत सासणे : प्रज्ञा पवार यांना साहित्य पुरस्कार

# स्त्रियांच्या लिखाणाबद्दल आता चर्चा थांबवा

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** अलीकडे अनुभवायला येणाऱ्या नवतुच्छता वादाची सुरुवात स्त्रियांच्या शिक्षित होण्यापासून आणि त्यांच्या लेखनाला स्वरूप प्राप्त होण्याच्या वास्तवापासून झालेली आहे. आज नवतुच्छता वाद हा भयकारी अवस्थेला पोहोचलेला आहे. स्त्रियांच्या लिखाणाबद्दल बरेच काही बोलले गेले आहे. यासंदर्भात चर्चा करणे आता जवळपास कालबाह्य व्हायला पाहिजे, असे मत अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष भारत सासणे यांनी व्यक्त केले.

प्रख्यात कवयित्री प्रा. डॉ. प्रज्ञा पवार यांना यंदाचा गंगाधर गाडगीळ साहित्य [illegible]ार सासणे यांच्या हस्ते शुक्रवारी मराठी ग्रंथ संग्रहालयात प्रदान करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ समीक्षक मीना गोखले, पॉप्युलर प्रकाशनचे प्रकाशक रामदास भटकळ आदी उपस्थित होते. सासणे म्हणाले की, स्त्रियांच्या लिखाणाबद्दल बरेच काही बोलले गेले आहे. यासंदर्भात चर्चा करणे आता जवळपास कालबाह्य व्हायला पाहिजे. तथापि, अजूनही यासंदर्भात चर्चा होत राहते. लेखनाच्या क्षेत्रात लिंगभाव नसावा. प्रामाणिक आणि प्रखर अशा सुरुवातीच्या काही लेखनापेक्षा मराठी साहित्य वर्तुळाने स्त्रियांच्या हौसेपोटी लिहिलेल्या आणि मनोरंजनात्मक अशा साहित्याबाबत टिंगलीचा सूर लावला होता. स्त्रीमुक्तीच्या एकूण भारलेल्या वातावरणापासून आणि त्या वातावरणातून काही स्त्रीलेखकांनी स्वत:चा वेगळा ठसा उमटवला आणि समीक्षेला गंभीर दखल घेण्यास भाग पाडले. ज्यांनी हे केले त्या अनवट वाटेवरच्या प्रवासी म्हणून पवार या वाटचाल करत आहेत.



ठाण्यात शुक्रवारी डॉ. प्रज्ञा दया पवार यांना गंगाधर गाडगीळ पुरस्कार देताना भारत सासणे आणि रामदास भटकळ.

गंगाधर गाडगीळ यांचे संपूर्ण साहित्य मी वाचले आहे. ज्यांनी मध्यमवर्गीयांचा दांभिकपणा अधोरेखित केला, अशा मोठ्या लेखकाच्या नावे पुरस्कार स्वीकारताना मला खूप आनंद होत आहे. - डॉ. प्रज्ञा पवार, कवयित्री

## सर्वत्र सुमारीकरण

■ स्त्रीमुक्तीची वेगळी संकल्पना मांडली गेली, तेव्हा स्त्री लेखकांचा वेगळा संघर्ष सुरू झालेला आहे. या कालखंडात ज्यांनी ज्यांनी लिहिले त्य सर्व गंभीर प्रकृतीच्या लेखिकांनी अन्यायकारी दृष्टिकोन मोडीत काढले आणि मनुष्यवादाचा नवा प्रारंभ केला

■ **कथित स्त्रीवादाच्या पलीकडे जाणारा हा मनुष्यवाद आहे. आज बुद्धिवाद आणि बुद्धिवाद्यांचा तिरस्का केला जात आहे, तसेच सर्वत्र सुमारीकरण होताना दिसत आहे.**

■ अशा परिस्थितीत प्रज्ञा पवार या बुद्धिगम्य लेखिकेसमोर वेगळे आव्हान उभे राहिलेले आहे. पवार यांच्यासमोर काही अनवट वाटा आहेत. असाच प्रवास अविरत करत राहिल्यास त्या महत्त्वाच्या दखलपात्र आणि श्रेष्ठ लेखिका बनतील, अशी आशा सासणे यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र टाइम्स

मंगळवार, १३ डिसेंबर २०२२

ठाणे

# लेखकांनी व्यवस्थेतील दोषांविरुद्ध भूमिका घ्यावी

म. टा. वृत्तसेवा, ठाणे



## प्रज्ञा दया पवार यांचे प्रतिपादन

विविधेतून एकता हे भारतीयत्वाचे प्रमुख वैशिष्ट्यच सध्या धोक्यात आले आहे. सगळ्यांना एकाच रंगात रंगविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सभोवती घडणाऱ्या अशा घटनांविरुद्ध मांडलेली भूमिका आता काहींना आवडत नाही, परंतु एक संवेदनशील लेखक म्हणून व्यवस्थेतील दोषांविरूद्ध सातत्याने भूमिका घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखिका-कवयित्री डॉ. प्रज्ञा दया पवार यांनी शुक्रवारी नुकतेच येथील मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सभागृहात गंगाधर गाडगीळ साहित्य पुरस्कार स्वीकारल्यानंतर बोलताना केले. 'पॉप्युलर प्रकाशन' आणि 'वासंती गंगाधर गाडगीळ विश्वस्त निधी' यांच्या संयुक्त विद्यमाने दर तीन वर्षांनी हा पुरस्कार दिला जातो.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष भारत सासणे, ज्येष्ठ संपादक-लेखक रामदास भटकळ, ज्येष्ठ समीक्षक मीना गोखले यावेळी उपस्थित होते. २५ हजार रुपये रोख, मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि पुस्तक असे पुरस्काराचे स्वरूप होते.

भारत सासणे यांनी त्यांच्या भाषणात, 'सध्याच्या काळात बुद्धिवाद्यांचा तिरस्कार केला जात आहे. सर्वत्र भयकारी अवस्था आहे. सर्व घटकांचे सुमारीकरण सुरू आहे. अशा काळात स्वत्व जपत विशिष्ट भूमिका घेऊन लेखन करणाऱ्या प्रज्ञा दया पवार या दखलपात्र लेखिका आहेत,' असे मत व्यक्त केले. त्यांनी इतर साहित्य प्रकारांबरोबरचं आता कादंबरीही लिहावी, अशी सूचना त्यांनी केली. 'आपल्याकडे स्त्रियांना सुरुवातीच्या काळात शिक्षणाचे अधिकार नव्हते. त्यामुळे त्या उशिरा साक्षर झाल्या. कालांतराने लिहू लागल्या. स्त्रियांचे सुरुवातीचे बहुतेक लेखन हौसेपोटी केलेले होते. त्यात पुरुषप्रधान संस्कृतीने जोपासलेल्या नवतुच्छतावादाने स्त्रियांचे शिक्षण आणि त्यांचे लेखन याकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला. परंतु स्वतंत्र बाजाच्या लेखनाने स्त्री लेखिकांनी साहित्य विश्वाला दखल घ्यायला भाग पाडले, असेही सासणे म्हणाले. मीना गोखले यांनी त्यांच्या भाषणात वंचित, उपेक्षितांबद्दल भूमिका घेणे आणि कृतिशील असणे या प्रज्ञा दया पवार यांच्या गुणांचा उल्लेख केला. तत्पूर्वी रामदास भटकळ यांनी गंगाधर गाडगीळांविषयीच्या काही आठवणींना उजळा दिला. यावेळी डॉ. प्रज्ञा दया पवार यांनी त्यांच्या काही कविताही सादर केल्या.

ठाणेवैभव

ठाणे, बुधवार १४ डिसेंबर २०२२

### ‘गोदा’ आणि फ्लाइंग राणी’ला अनुक्रमे दुसरा आणि तिसरा क्रमांक

# डोन्ट क्विंट एकांकिकेने पटकावला कोकण चषक




**ठाणे :** कोकण कला अकादमी आणि संस्कार प्रतिष्ठान आयोजित कोकण चषक 2022 एकांकिका स्पर्धा मोठ्या दिमाखात पार पडली. आमदार संजय केळकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्पर्धेत स्वप्नपूर्ती क्रियेशन या संस्थेच्या डोन्ट क्विंट या एकांकिकेने कोकण चषक पटकावला.

आमदार संजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली कोकण कला अकादमी आणि संस्कार प्रतिष्ठान आयोजित कोकण चषक 2022 हि एकांकिका स्पर्धा मोठ्या दिमाखात आणि उत्साहात झाली. डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे रविवार 11 डिसेंबर 2022 रोजी दुपारी 3 पासून रात्री 11 वाजेपर्यंत या एकांकिका सादर झाल्या. स्पर्धेचे उदघाटन आमदार संजय केळकर यांच्या हस्ते झाले.

प्राथमिक फेरीमध्ये तब्बल 18 संस्थांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेच्या एकांकिकांची प्राथमिक फेरी 9 आणि 10 डिसेंबर रोजी आनंद विश्व गुरुकुल शाळा येथे सादर झाल्या. प्राथमिक फेरीचे परीक्षण भालचंद्र कुबल आणि मृणाल चेंबूरकर यांनी केले.

अंतिम फेरीमध्ये कलामंथन संस्थची फ्लाईंग राणी, ज्ञानसाधना नाट्य परिवार संस्थेची डोक्यात गेलंय, कलासक्त मुंबई संस्थेची राकस, वझे महाविद्यालय संस्थेची जन्नत उल फिर्दोस, स्वप्नपूर्ती क्रिएशन्स या संस्थेची डोन्ट क्विंट, माय नाटक कंपनी (विरार) या संस्थेची गोदा, कलरफुल मॉंक

➤➤पान २ व

## डोन्ट क्विंट एकांकिकेने पटकावला कोकण चषक

या संस्थेची टिनीटस या संस्थांनी प्रवेश मिळवला होता.

स्वप्नपूर्ती क्रियेशन ह्या संस्थेच्या डोन्ट क्विंट या एकांकिकेने कोकण चषक पटकावला. या एकांकिकेचे लेखन अनिकेत बोले यांचे असून दिग्दर्शन अनिकेत प्रफुल्ल यांनी केले आहे. माय नाटक कंपनी ह्या संस्थेच्या गोदा या एकांकिकेने द्वितीय क्रमांक पटकावला. या एकांकिकेचे लेखन अनिकेत मोरे यांनी केले असून दिग्दर्शन शार्दूल आपटे यांनी केले आहे. कलामंथन या संस्थेच्या फ्लाईंग राणी ह्या एकांकिकेने तृतीय क्रमांक पटकावला. या एकांकिकेचे लेखन मोहन बनसोडे यांनी तर दिग्दर्शन विजय पाटील यांनी केले. या विजेत्यांचे आणि अंतिम फेरीतील सर्व सहभागी संस्थांचे कौतुक श्री.केळकर यांनी केले.

कोकण चषक 2022 च्या अंतिम फेरी चे परीक्षक मृणाल चेंबूरकर, भालचंद्र कुबल, शिरीष लाटकर, संगीत कुलकर्णी, किशोरी आंबिये यांनी केले. पारितोषिक वितरण प्रा.प्रदीप ढवळ, राजेश उके, प्रा.मंदार टिल्लू आणि वरील सर्व परीक्षकांच्या हस्ते झाले तर ह्या संपूर्ण स्पर्धेचे आयोजन प्रा.मंदार टिल्लू, बाळकृष्ण ओडेकर, आकाश राऊत (देवराज साळवी), प्रा.हर्षाला लिखिते, सतीश आगाशे, प्रा.संतोष गावडे, वैभव पटवर्धन, अमोल आपटे, सुनील जोशी, राहुल कदम या समितीने केले.

लोकसत्ता
शनिवार, १७ डिसेंबर २०२२

# ‘महाराष्ट्राची लोकांकिका’ आज ठरणार

## ज्येष्ठ अभिनेते परेश रावल यांच्या संवादाने सांगता

लोकसत्ता प्रतिनिधी



**मुंबई :** गेले कित्येक दिवस तहान-भूक हरपून केलेल्या तालमी, तनमनात भिनलेले नाटक घेऊन ‘लोकसत्ता लोकांकिका’च्या मंचावर आपापल्या विभागात अव्वल ठरलेल्या महाविद्यालयीन रंगकर्मीसमोर जेतेपदाचा क्षण अनुभवण्याची संधी येऊन ठेपली आहे. राज्यभरातून निवडून आलेल्या आठ एकांकिकांमध्ये ‘लोकसत्ता लोकांकिका’चा बहुमान मिळवण्यासाठी होणारी अटीतटीची लढाई आज महाअंतिम सोहळ्यात अनुभवता येणार आहे. तरुणाईच्या या रंगमंचीय आविष्काराला दाद देण्यासाठी प्रसिध्द अभिनेते परेश रावल हे ‘लोकसत्ता लोकांकिका’ महाअंतिम सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. ज्येष्ठ रंगकर्मी *(पान ४ वर)*

सॉफ्ट कॉर्नर®
स्वप्न मनामनातलं । निसर्गाच्या सान्निध्यातलं ॥
presents
लोकसत्ता लोकांकिका
in association with
ZEE युवा
Togetherring

### महाअंतिम सोहळा...

- **कधी :** आज, १७ डिसेंबर
- **कुठे :** रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी
- **वेळ :** सकाळी ९.३० वा.

या सोहळ्याच्या विनामूल्य प्रवेशिका १७ डिसेंबरला सकाळी ९ वाजल्यापासून रवींद्र नाट्यमंदिर येथे उपलब्ध होतील. एका व्यक्तीला एक प्रवेशिका दिली जाईल. काही जागा निमंत्रितांसाठी राखीव आहेत.

**प्रायोजक :** लोकसत्ता आयोजित ‘सॉफ्ट कॉर्नर’ प्रस्तुत ‘लोकसत्ता लोकांकिका’ स्पर्धा सहप्रायोजक ‘झी युवा’ आणि ‘टुगेदरिंग’च्या सहकार्याने पार पडणार आहे. ही स्पर्धा पॉवर्ड बाय ‘इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड’, ‘केसरी टूर्स’ आणि ‘मे. बी. जी. चितळे डेअरी’तर्फे आहे. साहाय्य ‘अस्तित्व’चे आहे. लोकांकिकेच्या मंचावरील कलाकारांच्या कलागुणांना चित्रपट, मालिकेत संधी देणारे ‘आयरिस प्रॉडक्शन’ टॅलेंट पार्टनर आहेत.

# ‘महाराष्ट्राची लोकांकिका’ आज ठरण

*(पान ३ वरून)*

अजित भुरे हे रावल यांच्याशी संवाद साधणार असून ते या महाअंतिम सोहळ्याचे आणखी एक आकर्षण ठरणार आहे.

‘लोकसत्ता लोकांकिका’ या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेची महाअंतिम फेरी शनिवारी, १७ डिसेंबरला प्रभादेवी येथील रवींद्र नाट्यमंदिरात रंगणार आहे. आठ केंद्रांवरून प्राथमिक आणि विभागीय अंतिम फेरीचे आव्हान पूर्ण करण्यात यशस्वी ठरलेल्या आणि महाअंतिम फेरीत पोहोचलेल्या एकांकिकांचे संघ ‘लोकसत्ता लोकांकिका’चा बहुमान मिळवण्यासाठी सज्ज झाले आहेत. गेले तीन ते चार आठवडे राज्यभरातील तरुणाई ‘लोकांकिका’मय झाली आहे. आशयघन एकांकिकांचे सादीकरण आणि महाविद्यालयांची अनोखी ऊर्जा, अवतीभवती घडणाऱ्या घटनांवर कलेच्या माध्यमातून अभिव्यक्त होण्याची त्यांची तळमळ असा आगळा माहोल रसिकांना अनुभवता आला. आता अंतिम फेरीसाठी पुन्हा एकदा त्याच तयारीने रंगमंचावर उतरण्यासाठी आठही महाविद्यालयांचे संघ सज्ज झाले आहेत. करोनामुळे दोन वर्षांच्या खंडांनंतर ‘लोकसत्ता लोकांकिका’ स्पर्धा मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, कोल्हापूर, औरंगाबाद आणि रत्नागिरी अशा आठ केंद्रांवर अतिशय उत्साहात आणि दणक्यात पार पडली. यावर्षी लोकांकिका स्पर्धा होणारच या विश्वासाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी स्पर्धेची घोषणा होण्याआधीपासूनच आपापल्या स्तरावर संहिता लेखनापासून जय्यत तयारी सुरू केली होती.

त्यानंतरही सत्रांत परीक्षा, इतर एकांकिका स्पर्धा यातून वेळ काढत महाविद्यालयांच्या सहकार्याने या तरुण रंगकर्मीनी ‘लोकसत्ता लोकांकिका’चे प्राथमिक आणि विभागीय अंतिम फेरीचे आव्हान पूर्ण केले. आता ध्यास यावर्षीच्या जेतेपदाचा... आठही संघांतील रंगकर्मींचे लक्ष आता फेरीतील आपल्या सादरीक एकवटले आहे.

‘लोकसत्ता’ आयोजित कॉर्नर’ प्रस्तुत, सहप्रायोज युवा’, ‘टुगेदरिंग’, पॉवड ‘इंडियन ऑइल कॉ लिमिटेड’, ‘केसरी टूर्स’ आ बी. जी. चितळे डेअरी’ ‘अस्तित्व’चे सहाय्य ‘आयरिस प्रॉडक्शन’ टॅलेंट म्हणून लाभलेल्या ‘लो लोकांकिका’ महाअंतिम न्यवर परीक्षक, प्रायोजक, चित्रपट वर्तुळातील नाम मांदियाळीत रंगणार ‘लोकसत्ता लोकांकिका’चा कोण पटकावणार याचे मिळणार आहे.

### महाअंतिम फेरीतील एकांकिका

- **उकळी** - कीर्ती एम. डुंगरसी महाविद्यालय, मुंबई
- **टॉक** - न्यू आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, औरंगाबाद
- **हर्लेक्युईन** - सौ. स्मिताताई हिरे कॉलेज ऑफ अ‍ॅप्लाइड आर्ट्स, परफॉर्मि आर्ट्स अ‍ॅण्ड फॅशन डिझाइन महाविद्यालय, नाशिक
- **डोक्यात गेलंय** - सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे
- **न्यायालयात जाणारा प्राणी**- विठ्ठलराव खोब्रागडे महाविद्यालय, नागपूर
- **मध्यांतर** - बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय (बीएमसीसी), पुणे
- **कुपान** - गोगटे-जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी
- **विषाद** - डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सामना
गुरुवार, दि. २२ डिसेंबर २०२२

# उंबरठा एकांकिका स्पर्धेची रविवारी अंतिम फेरी

## सात एकांकिकांमध्ये रंगणार चुरस

***उत्कर्ष*** सेवा मंडळाच्या 'उंबरठा' या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी रविवार, २५ डिसेंबर रोजी प्रभादेवी येथील रवींद्र नाट्यमंदिरात रंगणार आहे. अंतिम फेरीमध्ये सात एकांकिकांमध्ये चुरस रंगणार आहे.

संस्थेच्या वतीने सलग १९ वर्षे 'उंबरठा' या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. नोव्हेंबरमध्ये




**सामना**
**माध्यम प्रायोजक**

स्पर्धेची प्राथमिक फेरी पार पडली यात ४० संस्था सहभागी झाल्या होत्या. यातून सात एकांकिका अंतिम फेरीत पोहोचल्या आहेत. यात आखाडा (एकदम कडक नाट्य संस्था, भाईंदर पूर्व), डोक्यात गेलंय (ज्ञानसाधना नाट्य परिवार), बारम (महर्षी दयानंद महाविद्यालय), हाऊ कॅन आय हेल्प यू (नाट्यरसमय), प्रवास ( नाट्यस्पर्श आणि भवन्स महाविद्यालय), काहीतरी अडकलंय (गुरू नानक खालसा स्वायत्त महाविद्यालय), उकळी (कीर्ती महाविद्यालय) या एकांकिकांचा समावेश आहे.

लोकमत

सोमवार
२६.१२.२०२२

# कलागुणांनी रंगला इंद्रधनू आणि युटोपिया सोहळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : टी-शर्ट पेंटिंग, स्केचिंग, वाद्यवादन, प्रहसन, रॅप, रांगोळी, रंगभूषा, मेहंदी, शॉर्ट फिल्म, गीतगायन आणि नृत्य टॅटू मेकिंग, आय मास्क मेकिंग, मान्यवरांच्या मुलाखती अशा विविध कार्यक्रमांनी इंद्रधनू आणि युटोपिया कार्निवल जल्लोषात झाला.

दरवर्षीप्रमाणे यंदाही सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील इंद्रधनू महोत्सव (कनिष्ठ महाविद्यालय) आणि युटोपिया कार्निवल्स (वरिष्ठ महाविद्यालय) जल्लोषात झाला आहे. युटोपिया कार्निवलमध्ये 'सेल्फी पॉइंट मेकिंग' या विषयावर सुवर्णपदक विजेते अविनाश पाटील यांनी विद्यार्थ्यांना, तर १३ डिसेंबरला अतुल परचुरे यांनी मार्गदर्शन केले.

१६ डिसेंबरला स. वि. कुलकर्णी गौरव व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. २३ डिसेंबरला बिग बॉस फेम मॉडल डॉ. रोहित शिंदे यांच्या हस्ते युटोपिया महोत्सवातील गीतगायन आणि नृत्य स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित केला. इंद्रधनू महोत्सवाचे उद्घाटन अभिनेत्री मोनालिसा बागल यांच्या हस्ते झाले.

यावेळी प्रा. महेश कुलसंगे यांनी ऋतुजा केसरकर आणि अंबर पोचे या विज्ञान शाखेतील विद्यार्थिनींबरोबर त्यांची मुलाखत घेतली. कोणतेही यश सहज सध्या होत नाही त्यासाठी प्रचंड मेहनत घ्यावी लागते, संयम असणे गरजेचे ठरते, असा संदेश बागल यांनी तरुणांना दिला. इंद्रधनू आणि युटोपिया या महोत्सवाचे आयोजन संस्थेचे सचिव कमलेश प्रधान, सह सचिव मानसी प्रधान, खजिनदार सतीश शेठ, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य सीताराम वाहुळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

ठाणेवैभव

ठाणे, बुधवार २५ जानेवारी २०२३

# सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचे अनोखे स्नेहसंमंलन

**ठाणे:** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. एकूण 1000-1500 माजी विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

1981 च्या पहिल्या बॅचच्या विद्यार्थी, प्रख्यात निर्माता-दिग्दर्शक हॅरी फर्नांडिस आणि सुप्रसिद्ध जादूगार मधुगंधा इंद्रजीत तसेच पहिल्या बॅचचे शिक्षक डॉ. विद्या नानल आणि प्रा. भारती जोशी यांच्या हस्ते वृक्षारोपण करून स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. महाविद्यालयात व्यतीत केलेल्या क्षणांचा स्मृतिजागर आणि मित्रगण व सर्व शिक्षकांशी पुनर्भेट असे या कार्यक्रमाचे स्वरूप होते. या प्रसंगी माजी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी विद्यार्थी अभिनेत्री निकिता घाग आणि पूजा कांबळे यांनी केले. त्यांच्या जोडीला जागृती शर्मा, सिद्धांत जाधव, रोहन पाठारे आणि महेश्वरी पाटील या माजी विद्यार्थ्यांनीही सूत्रसंचालनाची जबाबदारी पार पाडली. संगीत विशारद मिनल शिंदे, राहुल



नायर, गीता कुलकर्णी आणि कुलदीप यांनी आपल्या सुमधुर गायनाने विद्यार्थी मित्रांना मोहून टाकले. तर मोठ्यांचे बालपणातील कुतूहल आजही जपणाऱ्या जादूगार मधुगंधा कुलकर्णी यांनी आपल्या जादूच्या प्रयोगांनी कार्यक्रमात बहार आणली. मराठी आणि हिंदी दूरदर्शन मालिकांचे सुप्रसिद्ध दिग्दर्शक रवी करमरकर यांनी आपल्या कविता सादर केल्या. तर एस.एन.डी.टी. महाविद्यालयात संगीत शिक्षक असणारे प्रणव शेंबेकर यांनी आपल्या सितार वादनाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. आजी-माजी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्य-गायनाचा कार्यक्रमही सादर केला. विविध क्षेत्रातील या गुणी कलावंतांमुळे ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणाला कला-साहित्य-संगीत महोत्सवाचे रुप प्राप्त झाले. या सर्व विद्यार्थ्यांना शुभाशिर्वाद देण्यासाठी महाविद्यालयातील अनेक निवृत्त प्राध्यापक आवर्जून उपस्थित होते.

सर्व माजी विद्यार्थ्यांचे स्वागत पेन आणि अल्पोपहार देऊन करण्यात आले. पी. सावळाराम सभागृहात विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाच्या भव्य छायाचित्रासमोर सेल्फी पॉईंट करण्यात आला होता. तिथे अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांसोबतच्या आठवणींना पुन्हा एकदा कॅमेऱ्यामध्ये साठवले. तर विविध विद्यार्थी एकत्र येऊन आपल्या बॅचचे प्लॅकार्ड्स हातात घेऊन पुन्हा एकदा आपल्या मित्रांसोबत ग्रुप फोटो काढण्याचा आनंद घेत होते. सभागृहात बेंचेस ठेवले होते तिथे पुन्हा एकदा विद्यार्थी होण्याची गंमत अनेकांनी अनुभवली. ऑटोग्राफ वॉलपेपरवर अनेक माजी विद्यार्थ्यांनी आपल्या नावाची मुद्रा उमटवली. अनेक माजी विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा आपल्या वर्गात, सायन्स लॅब आणि लायब्ररीमध्ये जाऊन भेट दिली आणि लायब्ररीतील पुस्तकांवर आणि लॅबमधील साधनांवर पुन्हा एकदा आपली बोटे उमटवली.

महाविद्यालयाचे अध्यक्ष सतीश प्रधान सरांचे या प्रसंगी अनेक विद्यार्थ्यांनी आशिर्वाद घेतले. त्यांनी लावलेल्या या रोपट्याचा कल्पवृक्ष झाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्यासोबतच महाविद्यालयाचे पहिल्या फळीचे अनेक निवृत्त प्राध्यापक आवर्जून आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांनी माजी विद्यार्थ्यांचे स्वागत केले आणि महाविद्यालयाच्या प्रगतीचा आलेख माजी विद्यार्थ्यांसमोर सादर केला. तर संस्थेचे सचिव कमलेश प्रधान यांनी महाविद्यालयाचे बदलेले रुप उलगडून दाखवले. माजी विद्यार्थी मंचाचे प्रमुख प्रा. सुयश प्रधान यांनी कार्यक्रमाचे स्वरूप आणि माजी विद्यार्थी मंचाची भूमिका स्पष्ट केली. तर मंदार टिल्लू यांनी आभारप्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता केली.

या संपूर्ण कार्यक्रमाच्या आयोजनात महाविद्यालयातील व्यवस्थापन, प्राध्यापक आणि प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी खूप मोलाची कामगिरी बजावली. आयोजन समितीचे प्रमुख डॉ. राधिका मुखर्जी आणि डॉ. मनोज वाघ यांनी सर्व माजी विद्यार्थी आणि प्राध्यापक यांना एकत्र आणण्याची महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. तर प्रा. बाबासाहेब कांबळे यांच्या प्रयत्नाने राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व माजी स्वयंसेवक-विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी होऊ शकले. महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागातील डॉ. सरिता हाजिरनीस आणि डॉ. मंदा इंगळे यांनी उद्घाटनासाठी सुंदर रोपटे व सुशोभित कुंड्यांचे आयोजन केले होते. त्यामुळे नाविन्यपूर्ण रीतीने उद्घाटनाचा कार्यक्रम पार पडला. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या सहसचिव मानसी प्रधान यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे करण्यात आले.